मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | रविवार, २७ जुलै २०२५ | वर्ष- ३० | अंक-३७ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## मंत्रिपदामध्ये माझी जात आडवी येतेय... राष्ट्रवादीने मराठ्यांचा फक्त वापर केला!



**पुणे :** मागच्या पाच टर्मपासून आमदार असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके यांनी थेट स्वपक्षावर आणि अजित पवारांवर गंभीर आरोप केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने बीड जिल्ह्यात मराठा समाजाचा केवळ आणि केवळ वापर केला, मंत्रिपद देण्याची संधी आली तेव्हा ओबीसी आणि मागासवर्गीयांना संधी दिली, असा घणाघात आमदार सोळंकेंनी केला.



दापोली ते कांदिवली व्हाया नवी मुंबई सुडाच्या राजकारणाचा प्रवास

पान ४

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर भीषण अपघात

# बोरघाटात ब्रेक फेल झाल्याने कंटेनरची 25 वाहनांना धडक

## 30 ते 35 प्रवासी जखमी

**प्रतिनिधी**

■ **खालापूर**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर आज दुपारी खोपोली परिसरातील बोरघाटात एक अत्यंत भीषण अपघात झाला. ब्रेक फेल झालेल्या एका कंटेनरने 25 ते 30 हून अधिक वाहनांना जोरदार धडक दिली, ज्यामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. या अपघातात सुमारे 30 ते 35 प्रवासी जखमी झाले असून, एका महिला प्रवाशाचा मृत्यू झाला आहे.



सदरील अपघात खोपोली पोलिस ठाण्याच्या हद्दीत, नवीन बोगदा ते फूडमॉल हॉटेल दरम्यान, मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर दुपारी घडला. ब्रेक फेल झालेल्या कंटेनरचा ताबा सुटल्याने, त्याने समोर असलेल्या एकामागोमाग एक अशा अनेक चारचाकी, खासगी आणि मालवाहू वाहनांना जोरदार धडक दिली. अपघातातील वाहनांचे प्रचंड नुकसान झाले असून, काही गाड्या अक्षरशः चक्काचूर झाल्या आहेत. काही वाहनांमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका करण्यात बचाव पथकांना यश आले आहे. कंटेनरचे ब्रेक फेल झाल्याने हा अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलिस, महामार्ग सुरक्षा पथक आणि स्थानिक प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. 30 ते 35 प्रवासी किरकोळ ते गंभीर स्वरूपाच्या दुखापतींनी जखमी झाले असून, त्यांना खोपोलीतील नगरपालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी 20 ते 22 जणांना पुढील उपचारासाठी इतर रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले आहे.

**मुंबईकडे जाणारी वाहतूक झाली होती ठप्प**

या अपघातामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णतः ठप्प झाली आहे. वाहतूक पोलिस आणि महामार्ग प्राधिकरणाकडून वाहने बाजूला करण्याचे व वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत. अपघातामुळे अनेक वाहनचालक रस्त्यावर अडकून पडले. त्यामुळे स्थानिक स्तरावर मदत व पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली.

**मागील 4 वर्षांत 500 हून अधिक अपघात**

दरम्यान, मुंबई- पुणे एक्स्प्रेस वेवर जानेवारी 2021 ते जून 2025 या कालावधीत तब्बल 500 हून अधिक अपघात झाले आहेत. या अपघातांमध्ये 300 हून अधिक प्रवाशांना जीव गमवावा लागला आहे. अपघात रोखण्यासाठी प्रशासनाकडून वेगवेगळ्या उपाययोजना राबवल्या जात आहेत. मात्र, शनिवारी झालेल्या कंटेनर अपघाताने घाटातील अवजड वाहनांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# धनुष्यबाण व घड्याळ मूळ पक्षांना मिळतील...

**अजितदादा व शिंदेंचे पक्ष भाजपात विलीन होतील!**

## रोहीत पवारांच्या वक्तव्यांमुळे खळबळ

**प्रतिनिधी**

■ **मुंबई**

राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवारांनी मोठं विधान केलं आहे. धनुष्यबाण चिन्ह उद्धव ठाकरेंना मिळणार असून, काही महिन्यात घड्याळ चिन्ह आम्हाला मिळणार असल्याचा दावा त्यांनी केला आहे. इतकंच नाही तर एकनाथ शिंदे, अजितदादा त्यांचे पक्ष भाजपात विलीन करणार असल्याचं भाकीतही त्यांनी वर्तवलं आहे. एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे विधान केलं आहे.



"उद्धव ठाकरेंचा पक्ष धनुष्यबाणासाठी कोर्टात आहे आणि आम्हीदेखील घड्याळासाठी कोर्टात आहोत. आता पुढच्या काही महिन्यात अशी गेम होऊ शकते की, घड्याळ आम्हाला मिळू शकतं आणि धनुष्यबाण उद्धव ठाकरेंना मिळू शकतं. यानंतर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे पक्ष भाजपात विलीन करण्याचा पर्याय राहू शकतो. कदाचित अजित पवारांचे 40-42 आमदार आहेत आणि एकनाथ शिंदेंचे 57 आमदार आहेत, तिथे नव्याने निवडणूक होऊ शकते," असा खळबळजनक दावा रोहित पवारांनी केला आहे.

पुढे ते म्हणाले की, "अजित पवारांचा जिथे आमदार आहे जसं की भोर येथे मांडेकर हे अजित पवारांचे आमदार आहेत, तिथं काँग्रेसमधील थोपटे भाजपात गेले आहेत. शिवतरे पुरंदरमधून असून तिथे जगताप गेले आहेत. म्हणजे भाजपाने तयारी ठेवली आहे. याचा अर्थ नव्याने निवडणूक होऊ शकते. या 100 ठिकाणी निवडणूक होऊ शकते. भाजपाकडे 132 आमदार असून त्यांना 12 आमदार हवे आहेत. त्यांना फक्त 144 चं बहुमत पार करायचं आहे. तो झाला की सगळाच त्रास संपत आहे. आतून खेळी केली जात आहे".

फडणवीस चाणक्य असल्याचं सर्वजण म्हणतात. पण दुर्दैवाने चाणक्यनिती महाराष्ट्राच्या हितासाठी नाही तर राजकारणाच्या हितासाठी वापरत आहेत. अजितदादा व एकनाथ शिंदेंना आता चाणक्यनितीचे दणके बसत आहेत, असेही ते म्हणाले.

# भारत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनतोय!

■ **तुतीकोरिन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी तामिळनाडूमधील तब्बल 4,900 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन पार पडलं. जागतिक दर्जाच्या हवाई पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या आणि कनेक्टिव्हिटी वाढवण्याच्या पार्श्वभूमीवर तब्बल 450 कोटींच्या खर्चासह विकसित केलेल्या तुतीकोरिन विमानतळ टर्मिनलच्या इमारतीचे उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते पार पडलं आहे.

"नुकतंच ब्रिटन आणि भारत यांच्यात एक मुक्त व्यापार करार झाला आहे. जो या स्वप्नाला गती देतो. या करारामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेलाही नवीन बळकटी मिळेल. जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची आपली गती आणखी वेगवान होईल", असं मोदींनी म्हटलं आहे.



"तामिळनाडूच्या विकासासाठी भारत सरकार प्रयत्न करत आहे. आज केलेल्या उद्घाटनांची कामे हे देखील याचाच एक भाग आहे. 17,340 चौरस मीटर क्षेत्रफळावर पसरलेले हे टर्मिनल गर्दीच्या वेळी 1,350 प्रवाशांना आणि दरवर्षी 20 लाख प्रवाशांसाठी सुसज्ज असेल. तामिळनाडूचा विकास ही आमची मुख्य वचनबद्धता आहे. गेल्या दशकात केंद्र सरकारने मागील यूपीए सरकारच्या काळात दिलेल्या निधीच्या तुलनेत तिप्पट जास्त निधी तामिळनाडूला दिला", असं मोदींनी म्हटलं आहे.

## पंतप्रधान मोदी विष्णूचे 11वे अवतार!



■ **मुंबई**

भाजप नेते राज पुरोहित यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर मोठं वक्तव्य केलं आहे. 'पंतप्रधान मोदी हे विष्णूचे 11वे अवतार आहेत, असं वक्तव्य राज पुरोहित यांनी केलं आहे. भाजप नेते राज पुरोहित यांच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं असून खळबळ माजली आहे. ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची नुकतीच राज्यसभा सदस्यपदी वर्णी लागली. या नियुक्तीबद्दल आज वसंत स्मृती सभागृहात निकम यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता त्यावेळी पुरोहित बोलत होते.

**सविस्तर वृत्त पान 3**

# सरकार म्हणजे निकम्मी यंत्रणा

**प्रतिनिधी**

■ **नागपूर**

केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी हे आपल्या दाव्यांमुळं कायम चर्चेत असतात. पण बऱ्याचदा ते अत्यंत स्पष्टपणेही बोलत असतात, सरकारी कामकाजाबद्दलही ते बेधडक विधानं करतात. आता पुन्हा एकदा त्यांनी असंच एक विधान केलं आहे. सरकार म्हणजे निकम्मी यंत्रणा आहे, अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. नागपूरमध्ये एका ठिकाणी व्याख्यान देताना नितीन गडकरी बोलत होते.

जेव्हा तुमचे अच्छे दिन असतात तेव्हा समोरुन तुमचं कौतुक करणारे अनेक लोक असतात. कारण क्रेझ असते ग्लॅमर असतं. पण जेव्हा तुमची वेळ संपलेली असते कोणीही विचारत नाही. त्यामुळं जर पर्मनंट तुम्हाला लोकांनी वागवलं पाहिजे असं वाटत असेल तर करियर बनवा. मी फायनान्शिअल कन्सल्टंट नाही



पण फायनान्शिअल एक्स्पर्ट आहे. मी पाच-पाच लाखांची काम बिनपैशाची करत आहे. नागपुरात खेळण्यासाठी 300 स्टेडियम बनवण्याची माझी इच्छा आहे. पण माझ्या चार वर्षांच्या अनुभवानंतर माझ्या हे लक्षात आलं की, सरकार ही गोष्ट असते ती खूपच निकम्मी असते. कॉर्पोरेशन, एनआयटी यांच्या भरवशावर कोणतंही काम होऊ शकत नाही. चालत्या गाडीला पंक्चर करण्यात ते तरबेज असतात. फुकटात काहीही शिकवता कामा नये, मी तर राजकारणात आहे. राजकारणात फुकट्यांचा बाजार असतो सगळा, पण मी काहीही फुकटात मिळत नाही, असे गडकरी म्हणाले.

# फूटपाथ खासगी फायद्यासाठी वापरता येणार नाही !

**हायकोर्टाने पालिका अधिकाऱ्यांना सुनावले**

■ **मुंबई**

मुंबईतील फूटपाथवर होत असलेल्या अतिक्रमणांच्या प्रश्नावर उच्च न्यायालयाने गंभीर भूमिका घेतली आहे. फूटपाथ ही सार्वजनिक जागा आहे. ही जागा पादचाऱ्यांच्या वापरासाठी आहे. या जागेचा खासगी फायद्यासाठी वापर करता येणार नाही, असे स्पष्टपणे बजावत उच्च न्यायालयाने एका पान-बिडी स्टॉलच्या बेकायदेशीर बांधकामाच्या प्रकरणात पालिका अधिकाऱ्यांच्या चौकशीचा आदेश दिला आहे. गृहनिर्माण सोसायटीच्या बाहेरील फूटपाथवर बेकायदेशीर बांधकाम केलेल्या पान टपरी स्टॉलवर कारवाईची मागणी याचिकेतून करण्यात आली होती.

## बिजापूरमध्ये चार नक्षलवाद्यांचा खात्मा

**बिजापूर :** छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील बासगुडा भागात शनिवारी संध्याकाळी झालेल्या चकमकीत जवानांनी 4 नक्षलवाद्यांना ठार मारले. या सर्वांचे मृतदेह आणि मोठ्या प्रमाणात शस्त्रे, स्फोटके जप्त करण्यात आली आहेत ज्यात INSAS-SLR रायफल्सचा समावेश आहे. ठार झालेल्या नक्षलवाद्यांची संख्या वाढू शकते. नैऋत्य जंगलात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे.

# महिलांबाबत गिरीश महाजन यांचंच नाव कायम पुढे का येतं?

**खडसेंचा सवाल**

■ **जळगाव**

राज्याचे राजकारण सध्या हनीट्रॅप प्रकरणाने ढवळून निघाले आहे. जळगावमधील प्रफुल्ल लोढा अटकेत असून, याच पार्श्वभूमीवर गिरीश महाजन आणि एकनाथ खडसे यांच्यात आरोप-प्रत्यारोपांची तुफान लाट उसळली आहे.अशातच खडसेंनी थेट "महिलांशी संबंधित प्रत्येक प्रकरणात गिरीश महाजन यांचंच नाव का पुढं येतं?" असा सवाल केल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

एकनाथ खडसे यांनी पुढे महाजन यांना थेट आव्हान देत,स्वतःच्या मालमत्तेची सखोल चौकशी लावा, माझ्या मुलाच्या मृत्यूची सीआयडी चौकशी करा, प्रफुल्ल लोढाची नार्को टेस्ट करा "तुम्ही निर्दोष असाल, तर या तीनही गोष्टी करा, सत्य जनतेसमोर येऊ द्या,"असे आव्हान त्यांनी दिले आहे. खडसे पुढे म्हणाले कि, प्रफुल्ल लोढा म्हणाले होते माझ्याकडे गिरीश महाजन यांच्यावरील पुरावे आहेत. एक बटण दाबलं, की हिंदुस्थान हादरेल. ज्येष्ठ पत्रकार थत्ते यांनी यापूर्वी महाजन आणि महिला आयएएस अधिकाऱ्याच्या संबंधांबद्दल आरोप केले होते.तसेच विधानसभेतही महाजन यांना अजित पवारांसह बऱ्याच नेत्यांनी टोले लगावले आहेत. त्या लोढाची नार्को टेस्ट झाली पाहिजे तरच दूध का दूध, पाणी का पाणी होईल, असे खडसे म्हणाले.






वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, रविवार, २७ जुलै २०२५

## भाजप असल्फा मंडळातर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**मुंबई :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी असल्फा मंडळ - चांदिवली विधानसभा यांच्या वतीने भाजपा वॉर्ड १६० जनसंपर्क कार्यालय, पंचरत्न बिल्डिंग असल्फा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिराचे उदघाटन आमदार व भाजपा मुंबई महामंत्री संजय उपाध्याय यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी मुंबई प्रवक्ता ऍड. अनिकेत उज्ज्वल निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी स्थानिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवला. या रक्तदान शिबीर कार्यक्रमात चांदिवली विधानसभा संयोजक, माजी नगरसेवक प्रकाश मोरे, असल्फा मंडळ अध्यक्ष सौ. प्राजक्ता मौर्या, मुंबई सचिव, माजी नगरसेवक सिताराम तिवारी, मुंबई अध्यक्ष अल्पसंख्यांक मोर्चा, उत्तर मध्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष वसीम खान, उत्तर मध्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष शुभ्रांशु दीक्षित, असल्फा मंडळ महामंत्री परशुराम शिंदे, नितीन कांबळे आदिसह असल्फा मंडळातील वॉर्ड अध्यक्ष हरेंद्र सिंह (वॉर्ड १५८), प्रवीण कवर (वॉर्ड १५९), महेंद्र शिवांगी (वॉर्ड १६०) व माजी वार्ड अध्यक्ष प्रशांत मौर्या (१५८), व सौ. साधना शर्मा ( उत्तर भारतीय मोर्चा महिला उत्तर मध्य जिल्हा महामंत्री) आदी उपस्थित होते. दरम्यान या रक्तदान शिबिरामध्ये संयोजक माजी नगरसेवक प्रकाश मोरे यांनी सहभागी झालेल्या सर्व रक्तदात्यांचे आभार मानले.



### थोडक्यात

## मुंबईत अवेवा डे इंडिया 2025 औद्योगिक एआयचे प्रदर्शन

**मुंबई:** अवेवा या औद्योगिक सॉफ्टवेअर क्षेत्रातील आघाडीच्या आणि श्नायडर इलेक्ट्रिक ग्रुप च्या कंपनी तर्फे मुंबईत अवेवा इंडिया २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उर्जा, पायाभूत सुविधा, उत्पादन आणि युटिलिटीज क्षेत्रातील विविध महत्त्वपूर्ण घटक एकत्र येऊन त्यांनी औद्योगिक एआय आणि भारताच्या शाश्वत विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने भागीदारी करण्यासाठी चर्चा केली. भारतीय उद्योगजगत आता चौथ्या औद्योगिक क्रांती (इंडस्ट्री ४.०) कडे प्रस्थान करत असतांना इंडस्ट्रीयल इंटेलिजन्स-एआयची वाढ, आयओटी, रोबोटिक्स आणि बिग डेटा ॲनेलिटिक्स चा वापर हा फॅक्टरीज बरोबरच वाढती कार्यक्षमता आणि चांगल्या पुरवठाशृंखले मध्ये करणे शक्य आहे. अवेवा च्या इंडिया मार्केट लीडरचे व्हाईस प्रेसिडेंट अजित कुलकर्णी यांनी सांगितले " भारत आता एका गहन अशा औद्योगिक बदलांच्या उंबरठ्यावर असून हे बदल आर्थिक वाढ आणि शाश्वतता या दोन आवश्यकतांनुसार आहेत. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमां मध्ये 'हाऊ इंडस्ट्रील एआय कॅन ड्राईव्ह चेंज ॲन्ड अनलॉक न्यू लीव्हर्स ऑफ ग्रोथ' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चे मध्ये बोलतांना श्नायडर इलेक्ट्रिक च्या इंडस्ट्रीयल ऑटोमेशनचे व्हीपी अरविंद ककरु यांनी सांगितले " उद्योगांना पूर्ण डिजिटाईज करण्यासाठी कामकाजात मोकळेपणा आणि लवचिकता आणणे आवश्यक आहे.

## परळ टीटी पुलाच्या दुरुस्तीला मुहूर्त सापडला

**मुंबई:** परळ टीटी पुलाच्या मोठ्या संरचनात्मक दुरुस्तीला अखेर मुहूर्त मिळाला आहे. वारंवार खड्डे पडणाऱ्या या पुलाचे आता कॉक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या पुलाच्या मोठ्या दुरुस्तीच्या कामाला ऑक्टोबरमध्ये सुरुवात होणार आहेत. एक मार्गिका बंद ठेवून काम केले जाणार असल्यामुळे वाहतूक सुरळीत ठेवण्यास मदत होणार आहे. परळ टीटी पूल हा शहर आणि पूर्व उपनगराला जोडणारा महत्त्वाचा पूल आहे. या पुलावरून मोठ्या प्रमाणावर अवजड वाहने जात असल्यामुळे त्यावर वारंवार खड्डे पडतात. त्यामुळे या पुलाची वारंवार दुरुस्ती करावी लागते. या पुलावर मोठ्या संख्येने जोडसांधे असल्यामुळे वाहनांना वारंवार झटके बसतात. त्यामुळे या पुलाची दुरुस्ती करण्याची गरज आहे. परंतु, गेल्या काही वर्षांपासून या पुलाची मोठी दुरुस्तीची कामे हाती घेता आली नव्हती. लोअर परळ पुलाचेही काम काही वर्षांपर्यंत सुरू होते. त्यातच हा पुलही दुरुस्तीसाठी बंद केल्यास परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी होण्याची शक्यता होती. त्यामुळे या पुलाच्या मोठ्या दुरुस्तीची कामे पुढे ढकलण्यात आली होती. मात्र डांबराचा थर बदलून पुलाचे पुनपृष्ठीकरण करण्याचे काम डिसेंबर २०२३ मध्ये करण्यात आले होते.

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# 9 ऑगस्टच्या जागतिक आदिवासी दिनाची तलासरीत जोरदार तयारी

**प्रतिनिधी**
■ **तलासरी**

"जय जोहार!" या पारंपरिक अभिवादनासह आदिवासी एकतेचा निर्धार करत, डोंगरपाडा व परिसरातील ग्रामस्थ आणि युवकांनी येत्या ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात, पारंपरिक वेशभूषा आणि आदिवासी वाद्यांच्या गजरात साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

रविवार, दिनांक २० जुलै २०२५ रोजी झालेल्या नियोजन बैठकीत एकमताने या दिनासाठी कार्यक्रमाचे विस्तृत आयोजन निश्चित करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही रॅलीच्या माध्यमातून आदिवासी

### पारंपरिक थाटात भव्य रॅली निघणार



समाजाच्या अस्तित्व, संस्कृती आणि हक्कांचा जागर करण्यात येणार आहे.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९:३० वाजता काटीलपाडा येथील वाघोबाच्या पूजेनंतर होणार असून, सर्व सहभागी शनवारपाडा येथील वाघोबाच्या ठिकाणी एकत्र जमा होतील. या ठिकाणी पूजा, चहा आणि नाश्ता झाल्यानंतर सकाळी १०:३० वाजता रॅलीला सुरुवात होईल. रॅली कोकाटपाडा मार्गे डोंगरिपाडा येथे पोहचेल, जिथे पुन्हा वाघोबाची पूजा होईल. त्यानंतर रॅली इभाडपाडा मार्गे तलासरी उड्डाणपुलाखाली पोहचेल. या ठिकाणी समाजप्रबोधनपर थोडकं मार्गदर्शन आणि स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

पुढे रॅली तलासरी नाका, गोडाऊनमार्गे पुन्हा सूत्रकार ठिकाण डोंगरपाडा येथे पोहचेल. येथे सर्वांसाठी भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या माध्यमातून समाजाचा एकोपा, संस्कृतीची ओळख आणि हक्कांचा जागर व्यक्त केला जाणार आहे.

या नियोजन बैठकीला नवजीवन युवा मित्र मंडळ, प्रगती ग्रुप, अष्टविनायक मित्र मंडळ तसेच गोवरसेतपाडा, लाखनपाडा, वेडगपाडा, कोकाटपाडा, सायवन, रायपूर, वेवजी, सवरोली, काजळी, कोचाई, उपलाट, तलासरी आणि परिसरातील विविध गावांतील मित्र मंडळांचे प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन जयेश वेडगा आणि सचिन बेंदर यांनी केले, तर सुनील इभाड, सुरेश परहेड, अनिल मोहनकर यांसह अनेकांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या पुढील तयारीसाठी २ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता नियोजन बैठक आयोजित करण्यात आली असून, सर्व मंडळांनी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे. यावर्षीही आदिवासी समाज आपल्या समृद्ध परंपरा, सांस्कृतिक ओळख आणि हक्कांसाठी एकत्र येत "९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन" मोठ्या अभिमानाने साजरा करणार आहे.

### वाढदिवसाचा समाजाभिमुख आदर्श

# आमदार राजेंद्र गावित यांचा सामाजिक बांधिलकीतून रुग्णांना दिलासा



**प्रतिनिधी**
■ **डहाणू**

जनतेशी थेट संपर्क साधण्याचा सामाजिक दृष्टिकोन जपत पालघरचे आमदार राजेंद्र गावित यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त पारंपरिक सोहळयांना दुरुकरत कासा उपजिल्हा रुग्णालयास भेट देऊन रुग्णांची आस्थेने विचारपूस केली. या भेटीत त्यांनी रुग्णांना फळे व बिस्किटांचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचा एक प्रेरणादायी आदर्श उभारला आहे.

या प्रसंगी गावित यांनी दुर्गम आदिवासी भागातून आलेल्या अनेक रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली आणि त्यांची तातडीची गरज जाणून घेतली. त्यांनी उपस्थित रुग्णांना अल्प पहार दिला तसेच रुग्णालयातील वैद्यकीय सेवा व पायाभूत सुविधांची माहिती घेण्यासाठी डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णालय प्रशासनाशी सविस्तर चर्चा केली.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन वाघमारे यांनी आमदार गावित यांना पावसाळयात वाढलेल्या सर्पदंश, विंचूदंश, आणि संसर्गजन्य आजारांबाबत माहिती दिली. तसेच ग्रामीण भागातील गर्भवती महिलांची वाढती नोंदणी आणि त्यांच्या सुरक्षित प्रसूतीसाठी सुरू असलेल्या उपाययोजनांची माहितीही दिली.

रुग्णालय भेटीनंतर आमदार गावित यांनी विवळवेढे येथील महालक्ष्मी मंदिरात दर्शन घेऊन साधेपणाने वाढदिवस साजरा केला. त्यांनी कोणतेही मोठे सार्वजनिक समारंभ न करता भंडाऱ्याचे आयोजन करून जनतेमध्ये मिसळण्याला प्राधान्य दिले.

या कार्यक्रमात शिवसेना डहाणू तालुकाप्रमुख संतोष देशमुख, राजकुमार गिरी, तसेच अनेक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार गावित यांच्या या सामाजिक जाणिवेचे व लोकोन्मुख कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांचा हा समाजाभिमुख वाढदिवस जनतेशी प्रत्यक्ष संपर्क ठेवण्याचा एक अनुकरणीय मार्ग ठरत असून, इतर लोकप्रतिनिधींनाही यामधून प्रेरणा घेण्यासारखी बाब ठरते.

# लीना जैन मार्फत परफ्यूम जोडी गंगा आणि जोगी लॉंच

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

लीना जैन यांनी परफ्यूमच्या जगात पहिल्या सुगंध जोडीच्या लाँचची घोषणा केली आहे. गंगा आणि जोगी, ही एक परफ्यूम जोडी आहे जी भारतातील परवडणाऱ्या लक्झरी विभागात संवेदी क्रांतीची सुरुवात करते. फ्रेगंटा ही एक चळवळ आहे जी लक्झरीची पुनर्परिभाषा करते, पाश्चात्य रूढींपासून दूर जाते आणि भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला ऐश्वर्यचे अंतिम रूप म्हणून साजरे करते. सुगंध आणि भारताच्या मिश्रणातून जन्मलेले, "फ्रॅजेंटा" हे नाव ब्रँडच्या स्वदेशी राजेशाही देण्याच्या ध्येयाचे प्रतीक आहे, यानिमित्त फ्रेगंटाच्या संस्थापिका लीना जैन म्हणाल्या कि, फ्रेगंटाचा जन्म एका साध्या पण प्रभावी कल्पनेतून झाला आहे की लक्झरी ही आकांक्षा बाळगण्यासाठी परदेशातून येणे आवश्यक नाही. भारतातील सुगंध, कथा आणि आत्मा जगाला प्रेरणा देण्यासाठी पुरेसे समृद्ध आहेत. गंगा आणि जोगी यांच्यासोबत, आम्ही



केवळ परफ्यूम लाँच करत नाही तर असे भावनिक अनुभव देखील देत आहोत. या लाँच प्रसंगी विंदू दारा सिंग, नवीन प्रभाकर, मृणाल देसराज, डॉ. अनिल मुरारका, रामजी गुलाटी, धरती गुलाटी, अंकिता मैथी, प्रियंका बजाज, प्रशांत वीरेंद्र शर्मा, सिद्धार्थ बजाज, श्वेता पंडित, अर्शी खान, रोहित वर्मा, माधुरी पांडे, रेहान शाह, कविता वर्मा, आरती नागपाल, नवप्रीत कौर, दीपक सिंग, गुरप्रीत कौर चढ्ढा, अदिती शेट्टी, राकेश पॉल, विकास वर्मा, मिताली. नाग, राजीव रोडा, विपिन अनेजा, गुलफम खान, निवेदिता यांची उपस्थिती होती. बसू, नसीर खान, दिव्यांक पाटीधर आदिसह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# आदिवासी महिला उत्कर्ष सेवा संस्थेच्या वतीने जि. प. शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप

**प्रतिनिधी**
■ **जव्हार**

शिक्षणासाठी आवश्यक साहित्याची कमतरता दूर व्हावी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने आदिवासी महिला उत्कर्ष सेवा संस्था, यांच्या वतीने जव्हार येथील आडखडक, घोगऱ्याची मेट व गणेश नगर शाळेतील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य व वह्यांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत वर्ग 1 ते 5 वीच्या विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल, पेन, रबरी, कंपास बॉक्स, इत्यादी शालेय साहित्य देण्यात आले. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणात अडथळा येऊ नये म्हणून संस्थेने हा स्तुत्य उपक्रम राबवला.

कार्यक्रमाच्या वेळी संबंधित शाळांचे शिक्षक, ग्रामस्थ, पालक आणि संस्थेच्या पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या



प्रतिनिधींनी सांगितले की, "ग्रामीण आणि आदिवासी भागात शिक्षणासाठी मूलभूत साधनांची कमतरता मोठी अडचण ठरते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना छोट्याशा मदतीनेही मोठा दिलासा मिळतो."

विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला असून कासट वाडी ग्रामपंचायत चे सरपंच कल्पेश राऊत तसेच पालक व शिक्षकांनी संस्थेचे आभार मानत भविष्यातही अशा उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. "शिक्षण हा मुलांचा मूलभूत हक्क आहे आणि तो सहज सुलभपणे मिळावा यासाठी आमचे प्रयत्न सुरू राहतील," असे संस्थेच्या संगीता नामदेव चौधरी अध्यक्षा यांनी नमूद केले.तरी प्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख विनायक राऊत, जिल्हा परिषद माजी सदस्य गुलाब विनायक राऊत, संस्थेच्या अध्यक्षा संगीता नामदेव चौधरी, खजिनदार योगिता निलेश चौधरी, व संस्थेची सदस्य आणि पदाधिकारी तसेच ग्रामपंचायत सदस्य कुणाल सापटा, शंकर ईलात इत्यादी उपस्थित होते.

# आज हार्बर व मध्य रेल्वेचा 'मेगाब्लॉक'

■ **मुंबई**

आज रविवारी मध्य रेल्वे, मुंबई विभागाने आपल्या उपनगरी विभागांवर विविध अभियांत्रिकी व आणि देखभालीची कामे करण्यासाठी मेगाब्लॉक आयोजित केला आहे. ठाणे आणि कल्याण स्थानकांदरम्यान अप व डाऊन धीम्या मार्गावर ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत मेगाब्लॉक असणार आहे,लुंड स्थानक येथून १०.४३ ते ३.५३ पर्यंत सुटणाऱ्या डाऊन धीम्या /अर्धजलद ट्रेन, मुलुंड ते कल्याण दरम्यान डाऊन जलद मार्गावर वळविण्यात येतील. या गाड्या ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा आणि डोंबिवली स्थानकांवर थांबतील आणि आपल्या निर्धारित वेळेपेक्षा सुमारे १० मिनिटे उशिरा पोहोचतील. तरकल्याण येथून १०.३६ ते १५.५१ पर्यंत सुटणाऱ्या अप धिम्या/अर्ध जलद ट्रेन, कल्याण आणि मुलुंड स्थानकांदरम्यान जलद मार्गावर वळवल्या जातील. या ट्रेन्स डोंबिवली, दिवा, मुंब्रा, कळवा आणि ठाणे स्थानकांवर थांबतील आणि मुलुंड स्थानकावर अप धिम्या मार्गावर पुन्हा वळवल्या जातील आणि नियोजित वेळेपेक्षा १० मिनिटे उशिरा पोहोचतील.ठाणे करीता असलेल्या उपनगरी गाड्या निर्धारित डाऊन धीम्या मार्गावर चालवण्यात येतील.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत सुटणाऱ्या व तेथे येणाऱ्या सर्व अप व डाऊन धीम्या लोकल सेवा सुमारे १० मिनिटे उशिराने पोहोचतील/प्रस्थान करतील. दरम्यान,पनवेल-वाशी अप आणि डाउन हार्बर मार्गावर सकाळी ११.०५ ते दुपारी ४.०५ पर्यंत (पोर्ट लाईन वगळून) आणि पनवेल येथे सकाळी ११.०५ ते संध्याकाळी ५.०५ पर्यंत मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन ब्लॉक राहील पनवेल येथून १०.३३ ते ५.०७ पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे जाणाऱ्या अप हार्बर मार्गावरील सेवा आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून ०९.४५ ते १५.४४ पर्यंत पनवेल/बेलापूरकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा रद्द करण्यात येतील. पनवेल येथून ११.०२ ते १६.२६ पर्यंत ठाणे कडे जाणाऱ्या अप ट्रान्स-हार्बर मार्गावरील सेवा आणि ठाणे येथून १०.०१ ते ४.२४ पर्यंत पनवेलकडे जाणाऱ्या डाऊन ट्रान्स-हार्बर मार्गावरील ट्रेन रद्द राहतील

# पावसाचा फटका; वसई ग्रामीण भागात अंधारात तर रस्तेही गेले वाहून

### पारोळ वीज उपकेंद्राच्या गलथान कारभारावर संताप, वीजपुरवठा वारंवार खंडित

**प्रतिनिधी**
■ **वसई**

गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने वसई पूर्वेतील ग्रामीण भागात हजेरी लावल्याने एकीकडे शेतीला दिलासा मिळत असताना दुसरीकडे मात्र वीजपुरवठा कोसळून नागरिकांचे हाल सुरू झाले आहेत. पावसाचा हलकासा मारा किंवा विजांचा कडकडाट झाला तरी पारोळ वीज उपकेंद्राकडून 'खबरदारी'चा उपाय म्हणून सर्रास वीजपुरवठा खंडित केला जातो, आणि नागरिकांना तासनतास अंधारात चाचपडावे लागते.

पावसाळयाआधी वीज यंत्रणांच्या दुरुस्ती व देखभालीची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी नियोजन होणे गरजेचे होते. मात्र, नेहमीप्रमाणे यंदाही यंत्रणा दुर्लक्ष करताच, त्याचे परिणाम नागरिकांना भोगावे लागत आहेत. ग्रामीण भागातील वीजवाहिन्या, खांब, ट्रान्सफॉर्मर वारंवार कोसळत असून प्रत्येक वेळी मोठ्या वेळासाठी वीज गायब होते.

परिणामी, घरगुती कामकाज, विद्यार्थ्यांचे अभ्यास, व्यापाऱ्यांचे व्यवहार या साऱ्यांवर मोठा परिणाम होतो आहे.वसई पूर्वेतील अनेक गावांना वीज पुरवठा करणारे पारोळ वीज उपकेंद्र हे एकमेव केंद्र असून त्यावरून अनेक गावांचा भार उचलला जात आहे. विशेष म्हणजे, या केंद्रावर काम करणारे बरेचसे कर्मचारी कंत्राटी आणि अपुऱ्या प्रशिक्षणासह कार्यरत आहेत. त्यामुळे बिघाडांवेळी निर्णय घेण्यात व दुरुस्ती करण्यात दिरंगाई होते, असा आरोप स्थानिकांकडून होत आहे. त्यामुळे या उपकेंद्राची विभागणी करून स्वतंत्र वीज उपकेंद्र स्थापन करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

**शिरसाड-वज्रेश्वरी मार्गही धोकादायक; रस्ते वाहून गेले**

मुसळधार पावसाचा आणखी एक फटका शिरसाड-वज्रेश्वरी मार्गावरील रस्त्यांना बसला आहे. मांडवी, पारोळ फाटा आणि शिरवली येथील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून, मोठमोठे खड्डे व रस्त्याचे वाहून जाणे ही नित्याची बाब झाली आहे.दरवर्षी पीडब्ल्यूडीकडून केवळ खडी-माती टाकून तात्पुरते डागडुजीचे काम केले जाते, मात्र तेही पावसात वाहून जाते. यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. अपघातांचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी या मार्गावर कायमस्वरूपी डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे.

# कुर्ला विधानसभेत आमदार मंगेश कुडाळकरांची विकासाच्या दिशेने पावलं!



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

कुर्ला विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेचे आमदार मंगेश कुडाळकर यांच्या माध्यमातून मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या दालनात कुर्ला विधानसभा क्षेत्रातील नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या प्रकल्पांवर बैठक घेण्यात आली. या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती होती आणि पुढील टप्प्यांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चेत कुर्ला रेल्वे स्थानक पूर्व सॅटिस व बाजार भूखंड यांचा संयुक्त विकास कुर्ला स्थानकाच्या पूर्वेकडील बर्वे मार्गावर सुरू होणाऱ्या सॅटिस प्रकल्पासोबतच तेथील बाजार विभागाच्या भूखंडाचा समावेश करून एकत्रित प्रकल्प उभारण्याबाबत चर्चा झाली. या महत्त्वाच्या चर्चेअंती, महानगरपालिकेच्या वास्तुविशारद विभागामार्फत बाजार भूखंड, बेस्ट भूखंड आणि कुर्ला स्थानकाचा एकत्रित आराखडा तयार करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. हा आराखडा येत्या एक महिन्यात सादर होणार आहे. चुनाभट्टी फाटकावरील उड्डाणपूल प्रतिक्षा संपणार! चुनाभट्टी रेल्वे स्थानक परिसरात पूर्व आणि पश्चिम भागांना जोडणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामाचा देखील आढावा घेतला. सर्व आवश्यक परवानग्या रेल्वे प्रशासनाकडून प्राप्त झाल्या असून, लवकरच या कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ होणार असे आश्वासन आमदार मंगेश कुडाळकर यांना या बैठकीत देण्यात आले. याबाबत आमदार कुडाळकर यांनी सांगितले कि कुर्ला विधानसभा क्षेत्रातील हे प्रकल्प म्हणजे फक्त विकास नव्हे, तर कुर्ला व चुनाभट्टी परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन आयुष्यात आमूलाग्र सकारात्मक बदल घडवणारे निर्णय आहेत. नागरिकांच्या सहकार्याने, कुर्ला विधानसभेचा सर्वांगीण विकास करणे हेच माझं ध्येय आहे.

### हायवेवरील गुजराती पाट्यांविरोधात मनसे आक्रमक

# हॉटेलधारकांना दिला मराठी पाट्या लावण्याचा अल्टीमेटम

■ **पालघर**

मुंबई–अहमदाबाद महामार्गालगत अच्छाड ते घोडबंदर दरम्यान असलेल्या हॉटेलांवरील गुजराती भाषेतील नामफलकांवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आक्रमक भूमिका घेतली आहे. राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि ठाणे-पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्या सूचनेनुसार हे आंदोलन करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर तलासरीमध्ये मनसे पदाधिकारी आणि हॉटेल मालक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीसाठी पोलीस निरीक्षक अजय गोराड यांनी मध्यस्थीची भूमिका घेतली. या बैठकीत मनसे पदाधिकाऱ्यांनी हॉटेल मालकांना स्पष्ट सूचना दिल्या की, हॉटेलवरील नामफलक आणि मेनू



कार्ड्स मराठीत असणे आवश्यक आहे. येत्या सात दिवसांत मराठी पाट्या न लावल्यास 'मनसे स्टाईल'ने आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला. हॉटेल मालकांनी मनसेच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत, सात दिवसांत मराठी पाट्या आणि मेनू कार्ड्स लावण्याचे आश्वासन दिले. पोलीस निरीक्षक अजय गोराड यांनी देखील हॉटेलधारकांना कायद्यानुसार महाराष्ट्रात व्यावसायिक पाट्या मराठीत असणे बंधनकारक असल्याचे समजावले आणि पुढील वाद टाळण्याचे आवाहन केले.

या बैठकीस मनसेचे तलासरी तालुकाध्यक्ष विजय वाढीया, रस्ता आस्थापना उपसंघटक डहाणू नंदू कोदे, तालुका सचिव नितेश भेलका, उपतालुकाध्यक्ष जयेश म्हसे, विभाग अध्यक्ष कृष्णा फेसरडा, जितू भोईर, शाखाध्यक्ष जगदीश गोवारी, उपशाखाध्यक्ष नन्हू हाडळ, शैलेश म्हसे यांच्यासह अनेक महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.



**मुंबई :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिवगर्जना प्रतिष्ठान (सामाजिक संस्था दादर मुंबई) यांच्या वतीने असंख्य कर्ण बधिर दिव्यांग मुलांना कर्ण मशीनचे वाटप करण्यात आले तदप्रसंगी माहिम विधानसभा आमदार महेश सावंत व इतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# भांडुपच्या छत्रपती शिवाजी महाराज तलाव मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य !

### प्रशासनाचे दुर्लक्ष



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई महापालिका प्रशासनाचे मुंबई खड्डेमुक्त करण्याचे स्वप्न पुन्हा एकदा भंगले आहे असा आरोप सामाजिक कार्यकर्ते गणेश नारायण वराडे यांनी केला आहे. उपनगरातील सर्वात महत्त्वाचे ठिकाण असलेल्या भांडुप विभागात अनेक ठिकाणच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. दुचाकी वाहनचालकांना तर मोठी कसरत करावी लागत असून. भांडुप (प.) येथील छत्रपती शिवाजी महाराज तलाव मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाल्याने पादचारी नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन रहदारी करावी लागत असल्याने लवकरात लवकर खड्डे बुजवण्यात यावेत अशी मागणी गणेश वराडे यांनी मनपा प्रशासनाकडे केली आहे.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Thirty
Issu - 37
R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- तीसावे
अंक - ३७
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## मुंबई लोहमार्ग पोलिसांनी चोरी झालेले 634 मोबाईल केले फिर्यादींना परत

**मुंबई :** मुद्देमाल ( मोबाइल ) हस्तांतरण कार्यक्रमा दरम्यान पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई यांचे हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात उपस्थित ५० फिर्यादींना त्यांच्या मोबाईल फोनचे हस्तांतरण करण्यात आले असून उर्वरीत ६३४ मोबाईल हे दर्शनी भागावर उपलब्ध केले होते. ते संबंधीत फिर्यादी यांना सन्मानपूर्वक परत केले गेले .विशेष मोहिम अंतर्गत मुंबई लोहमार्ग पोलिसांनी एम. राकेश कलासागर, पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांचे आदेशान्वये व श्रीमती प्रज्ञा जेडगे, पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ, लोहमार्ग, मुंबई व श्रीमती सुनिता सांळुखे - ठाकरे पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ, लोहमार्ग, मुंबई, राजेंद्र रानमाळे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), सुधाकर बाबूराव शिरसाट, स. पो. आ. सी. एस.एम.टी विभाग, लोहमार्ग, मुंबई श्री किशोर महादेव शिंदे, स. पो. आ. बांद्रा विभाग, लोहमार्ग, मुंबई, विजय खेडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली व मंगेश जगन्नाथ खाडे, स.पो.नि. सायबर सेल, लोहमार्ग, मुंबई यांचे तांत्रिक विश्लेषणाचे मदतीने, अथक परिश्रम घेत चोरीस गेलेले ६८४ मोबाईल हस्तगत केले होते.




# वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये सौर ऊर्जेच्या वापरासाठी समिती स्थापन करावी!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

प्रतिनिधी
■ मुंबई

सामाजिक न्याय, आदिवासी विकास आणि इतर बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या नवीन सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत एकसमान निकष ठरवावे. या विभागांतर्गत असणाऱ्या सूतगिरण्यांसाठी त्या त्या विभागाने अतिरिक्त तरतूद करून द्यावी. तसेच वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये सौर ऊर्जेच्या वापरामध्ये येत असलेल्या अडचणी सोडवण्यासाठी वस्त्रोद्योग आणि ऊर्जा विभागाची समिती स्थापन करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वस्त्रोद्योग विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत



होते. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, विधान परिषदेचे आमदार अमरीश पटेल, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशु सिन्हा, वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने, रेशीम संचालनालयाचे संचालक विनय मुन, उपसचिव पवार, उपसचिव श्रीमती कोचरेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सहकारी सूतगिरण्यांना प्रति चाती रुपये पाच हजार प्रमाणे द्यावयाच्या कर्जावरील व्याज अनुदान योजनेस मुदतवाढ देताना यामध्ये आधुनिकीकरण आणि श्रेणीकरण करण्यात यावी. राज्यामधील राष्ट्रीय वस्त्र महामंडळाच्या अंतर्गत बंद असलेल्या मिल पुन्हा सुरू करण्याबाबत अहवाल तयार करावा. त्या आधारे बंद मिल पुन्हा सुरू करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात याव्यात. याचबरोबर सहकारी सूतगिरण्या व सहकारी यंत्रमाग संस्थाकडील शासकीय देणी वसुलीबाबत धोरण तयार करण्यात यावे. याचबरोबर राज्यातील सर्व यंत्रमागाच्या नोंदी करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. पुणे येथील रेशीम संचालनालयाच्या वापरात असलेली इमारत दुरुस्ती व इतर सोयी सुविधा निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची कार्यवाही तत्काळ पूर्ण करावी, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

नवीन महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ निर्माण करणे, वस्त्रोद्योग आयुक्तालय आणि रेशीम संचालनालयाचे विलीनीकरण करून वस्त्रोद्योग व रेशीम आयुक्तालयाची निर्मिती करणे, सहकारी सूतगिरण्यांकडील अतिरिक्त जमीन विक्रीस परवानगी देण्याबाबतची योजना, सूतगिरण्यांना पुनर्वसन कर्ज देण्यासाठी नवीन योजना तसेच सूतगिरण्या भाडेपट्टीवर देण्यासाठी योजना तयार करणे, सहकारी सूतगिरणी यांची प्रकल्प अहवाल किंमत रुपये ८०.९० कोटी वरून रुपये ११८ कोटी इतकी सुधारित करण्याबाबतची कार्यवाही करणे, सातारा जिल्ह्यातील वाई येथील रेड क्रॉस सोसायटी यांच्याकडील लिजवरील जागा जिल्हा रेशीम कार्यालयाकरिता कायमस्वरूपी घेणे आदी महत्त्वपूर्ण विषयांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

# पंतप्रधान मोदी विष्णूचे 11वे अवतार!

### भाजप नेते राज पुरोहित यांच्या वक्तव्याने खळबळ

प्रतिनिधी
■ मुंबई

भाजप नेते राज पुरोहित यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर मोठं वक्तव्य केलं आहे. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विष्णूचे ११वे अवतार आहेत, असं वक्तव्य राज पुरोहित यांनी केलं आहे. भाजप नेते राज पुरोहित यांच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं असून खळबळ माजली आहे.

ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची नुकतीच राज्यसभा सदस्यपदी वर्णी लागली. या नियुक्तीबद्दल आज दादर येथील वसंत स्मृती सभागृहात निकम यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात भाजप नेते प्रविण दरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सत्काराच्या कार्यक्रमाला भाजप नेते राज पुरोहित यांनीही हजेरी लावली. या कार्यक्रमात राज पुरोहित यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर मोठं विधान केलं.



**मोदी न थकणारे,न थांबणारे पंतप्रधान - पुरोहित**

राज पुरोहित म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विष्णूचे ११वे अवतार आहेत. ते न थकणारे, न थांबणारे पंतप्रधान आहेत. आपण अमेरिकेला जाऊन आलो की आपल्याला दोन दिवस जेट लॅग लागतो. नरेंद्र मोदी फिनलंड, इंग्लंड दौरा करून अहमदाबादमध्ये दोन दिवसांत २२ उद्घाटन करतात'. कौतुक करताना राज पुरोहितांनी नरेंद्र मोदींची विष्णू भगवानसोबत तुलना केली. भाजप नेते राज पुरोहित यांच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात एकच चर्चा सुरु झाली आहे.

**तुरुंग मतदारसंघ दिला, तर मला कुणीही हरवू शकणार नाही - उज्वल निकम**

नवनियुक्त राज्यसभा खासदार उज्ज्वल निकम म्हणाले, 'मी कुठल्याही गुन्हेगाराला न्यायालयाच्या माध्यमातून शिक्षा देण्याचा प्रयत्न करतोच. मात्र त्या गुन्हेगाराला समजून घेण्याचाही प्रयत्न करतो. त्याच्या कमकुवत बाजू जाणून घेतो. जेणेकरून त्याला अंतरिम दु:ख देण्याचा माझा प्रयत्न असतो'.मला तुरुंग हा जर मतदारसंघ दिला, तर मला कुणीही हरवू शकणार नाही. सर्व कैदी मला निवडून देतील. याची मला खात्री आहे. आज आमचा देश हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आहे. प्रत्येक कण माझा आहे. ही भावना प्रत्येक नागरिकांमध्ये निर्माण करण्याचे काम आपले आहे. आपल्या पक्षकारांना खोटे आश्वासन कधीही द्यायचे नाही, असेही निकम पुढे म्हणाले.

# सुप्रसिद्ध दिग्दर्शक आणि संकलक व्ही. एन. मयेकर यांचं निधन

प्रतिनिधी
■ मुंबई

सुप्रसिद्ध मराठी चित्रपट दिग्दर्शक व संकलक व्ही. एन. मयेकर यांचं निधन झालं आहे. दरम्यान, मयेकर यांच्या मृत्यूचं कारण अद्याप स्पष्ट झालं नाही. व्ही. एन. मयेकर यांना व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. त्यांचा मनोरंजन क्षेत्रातील वाटा लाख मोलाचा आहे. अशा हरहुन्नरी कलाकाराच्या निधनामुळे कलाविश्वावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

व्ही. एन. मयेकर यांनी अनेक वर्षांच्या कारकीर्दीत प्रतिभावंत दिग्दर्शकासोबत काम केलंय. व्ही. एन. मयेकर सुरुवातीला जी. जी. मयेकर यांचे सहाय्यक होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व्ही. एन. मयेकर यांनी संकलनपद्धती शिकली. बी.



आर. चोप्रा फिल्म्सचा 'छोटी सी बात' हा त्यांनी संकलित केलेला पहिला चित्रपट आहे. या सिनेमामुळे त्यांना प्रसिद्धी मिळाली. 'घायल', 'घातक', 'दामिनी', 'वास्तव', 'अस्तित्त्व' या चित्रपटासाठी उत्कृष्ट संकलनाची पारितोषिकेही त्यांनी पटकावली. त्याचबरोबर त्यांनी 'मी तुझी तुझीच रे', 'जन्मदाता', 'पसंत आहे मुलगी' या सिनेमाचं दिग्दर्शनसुद्धा केलंय

# कुर्ला येथील क्रांती नगरमध्ये घर कोसळले

### सुदैवाने जिवितहानी नाही

प्रतिनिधी
■ मुंबई

आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेवर पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असलेल्या कुर्ला येथील क्रांती नगर, बैल बाजार परिसरात घर पुन्हा एकदा कोसळण्याची दुर्घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत कुणी जखमी झाले नाही. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी तात्काळ अग्निशामन दलाने आणि स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेवून बचाव कार्य सुरु केले . या दुर्घटनेत मात्र घराचे प्रचंड नुकसान झाले.

येथील झोपडपट्टीमध्ये दरवर्षी पावसाळ्यात घर कोसळण्याच्या घटना घडतात, तरीसुध्दा राज्य सरकारकडून सदर बाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन होत



नाही, यामुळे सरकार आमचा जीव गेल्यावर पुनर्वसन करणार का? असा संताप झोपडीधारकांकडून व्यक्त केला जात आहे. येथील झोपड्यांना एमएमआरडीए फक्त नोटीसा देवून मोकळे होते, परंतु पुनर्वसन कधी, कुठे करणार, याविषयी काहीच बोलत नसल्याची माहिती रहिवाशांनी दिली.

भविष्यात पावसाळ्यात अशाप्रकारे घरे कोसळून जर जिवितहानी झाली, तर संपूर्ण जबाबदारी ही शासन व संबंधित प्राधिकरणाची असेल, असा इशारा झोपडपट्टी सुधार विभाग राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे मुंबई अध्यक्ष घनश्याम भापकर यांनी दिला आहे.

# 24 तासांत जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता; दिवसभरात संततधार

प्रतिनिधी
■ मुंबई

गेल्या दोन दिवसांपासून मुंबईत चांगला पाऊस पडत आहे. शनिवारी सकाळपासून सायंकाळपर्यंत पावसाची संततधार सुरू होती. त्यामुळे दिवसभर वातावरणात गारवा जाणवला. तर, समुद्रात दुपारी १.२० वाजता मोठी भरती होती. त्यामुळे समुद्रात ४.६७ मिटर उंचीच्या लाटा उसळल्या. मात्र त्याचवेळी अतिवृष्टी झाली नाही. अन्यथा सखल भागात पावसाचे पाणी साचून मुंबईकरांना त्याचा फटका बसला असता. सुदैवाने संततधार पावसानेही अधूनमधून अल्पशी विश्रांती घेतल्याने मुंबईकरांना पावसाच्या तडाख्यापासून दिलासा मिळाला.

दरम्यान, कुलाबा वेधशाळेने आगामी २४ तासांत आकाश ढगाळ राहिल. काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याची आणि अधूनमधून ४० ते ५० किमी प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. सुदैवाने मुंबईकर रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास गाढ झोपलेले असताना समुद्रात मोठ्या भरतीमुळे ४.११ मिटर उंचीच्या लाटा उसळल्या. त्याचा जनजीवनावर परिणाम झाला नाही. मात्र कुलाबा वेधशाळेने जोरदार पावसाबाबत पूर्व इशारा दिल्याने महापालिका प्रशासनाला आपली यंत्रणा रस्त्यावर उतरवावी लागणार आहे. तर मुंबईकरांनाही जोरदार पावसाच्या इशाऱ्यामुळे सतर्कता बाळगावी लागणार आहे.

# कांदिवली चारकोप मध्ये माजी खा. गोपाळ शेट्टी यांच्या हस्ते विरंगुळा केंद्राचे लोकार्पण?

प्रतिनिधी
■ मुंबई

माजी खासदार गोपाळ शेट्टी यांच्या प्रयत्नाने चारकोप सेक्टर ३, मध्ये ओंकारेश्वर मंदिरा शेजारील मोकळ्या जागेत सेवा संकुलाचे निर्माण करण्यात आले होते. काल त्याचे गोपाळ शेट्टी यांच्याच हस्ते लोकार्पण करण्यात आले.

गेली ३५ वर्षे चारकोप येथील वरिष्ठ नागरिक त्यांच्या हक्काचे विरंगुळा केंद्र हवे यासाठी झटत होते.त्यांची होणारी परवड लक्षात घेऊन गोपाळ शेट्टी यांनी एक प्रशस्त दालन उपलब्ध करून दिले त्याच बरोबर चारकोप रोहिदास पंचायत, कमल सेवा प्रतिष्ठान आणि जनमित्र सांसृतिक मंडळ यांनाही सेवा दालन उपलब्ध करून लोकार्पित केले.या



वेळी या प्रकल्पा साठी बोरिवलीचे आमदार संजय उपाध्याय यांचे यांनी मोलाचे सहकार्य लाभले.या कर्तव्यपूर्ती कार्यक्रमात आमदार संजय उपाध्याय यांनी आपल्या भाषणात, गोपाळ शेट्टी यांनी केलेल्या अनेक वर्षापासून केलेल्या कामांचा उलगडा उपस्थित नागरिकांकडे केला.

या कार्यक्रमासाठी परिश्रम घेणारे शरद साटम यांचा गोपाळ शेट्टी,आमदार संजय उपाध्याय आणि ज्येष्ठ नागरिक मित्र मंडळाच्या वतीने खास सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमासाठी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष महेश राऊत, को. वि.आघाडी अध्यक्ष सुमेश आंब्रे,माजी नगरसेविका संध्या दोशी,मंडळ अध्यक्षा सुरेखा ठोके, वॉर्ड अध्यक्षा श्रेया प्रभु मंचावर उपस्थित होत्या.

## 'जनसुरक्षा' विरोधात 14 ऑगस्टला मुंबईत राज्यव्यापी परिषद

**मुंबई:** जनविरोधी जनसुरक्षा कायदा रद्द करा या मागणीसाठी राज्यव्यापी जनआंदोलन सुरू असून त्याचा पुढचा टप्पा म्हणून १४ ऑगस्ट रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे डावे प्रागतिक पक्ष व संघटनांची जनसुरक्षा कायदा विरोधी संघर्ष समितीच्या वतीने राज्यव्यापी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरदचंद्र पवार यांनी मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहावे म्हणून त्यांना निमंत्रण देण्यासाठी समिती च्या शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली, यावेळी जनसुरक्षा कायदा विरोधी संघर्ष समितीचे सदस्य भारत जोडो अभियान च्या उल्का महाजन, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ अॅड सुभाष लांडे, कॉ प्रकाश रेड्डी,कॉ मिलिंद रानडे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. शैलेंद्र कांबळे,भारताचा कम्युनिस्ट पक्ष माले लिबरेशन चे कॉ उदय भट कॉ विजय कुलकर्णी उपस्थित होते.

# देवनार पाडा स्मशान भूमीची दुरवस्था

प्रतिनिधी
■ मुंबई

गोवंडी येथील देवनारपाडा स्मशान भूमी मधील धुराची चिमणी बंद पडल्याने अंत्यविधी करिता येणाऱ्या नातेवाईकांना धुराचा त्रास सहन करावा लागत आहे. अगोदरच मोठ्या प्रमाणात श्वसनाचे आजार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यातच दु:खी अंत:करणाने आलेले नातलग धुराची चिमणी बंद पडली असल्याने नाकातोंडात धूर जाऊन त्रस्त होत आहेत. तसेच या स्मशान सतत विज पुरवठा खंडित होतो. दफन भूमी वरील लाईट बंद आहे



त्यामुळे देखील नातलगांना त्रास सहन करावा लागतो. देवनार पाडा स्मशान भूमी च्या समस्यांबाबत सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र नगराळे प्रशासनासोबत पाठपुरावा करत आहेत. लवकरात लवकर या समस्येवर प्रशासनाने तोडगा अन्यथा त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी माफीला पात्र नाहीत!

### खासदार वर्षा गायकवाड यांच्या विधानाचा मुस्लिम समाजाकडून निषेध

प्रतिनिधी
■ मुंबई

७/११ च्या लोकल ट्रेनमधील बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींना पुरेशा पुराव्याच्या आधारे आणि कमकुवत तपासाच्या आधारे निर्दोष सोडण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयावर प्रतिक्रिया व्यक्त करताना, मुंबई काँग्रेस अध्यक्षा आणि खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की महाराष्ट्र सरकारने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान द्यावे, कारण त्यांच्या मते हे आरोपी माफीला पात्र नाहीत. यानंतर, मुस्लिम समाजातील विविध सामाजिक, कायदेशीर आणि धार्मिक व्यक्तींनी याचा तीव्र निषेध केला आहे.



ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे उपाध्यक्ष आणि माजी राज्यसभा सदस्य मौलाना ओबैदुल्ला खान आझमी म्हणाले की वर्षा गायकवाड यांनी मुस्लिमांचे उपकार विसरले आहेत आणि त्यांच्या जखमांवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. गेल्या निवडणुकीत मुस्लिमांनी त्यांना मनापासून पाठिंबा दिला होता. तथापि, बॉम्बस्फोट प्रकरणात निर्दोष सुटल्यानंतर मुस्लिम तरुणांचे स्वागत करण्याऐवजी, गायकवाड यांनी महाराष्ट्र सरकारला त्यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्याचा सल्ला देऊन करुणेचा अभाव दाखवला. माजी खासदार हुसेन दलवाई म्हणाले की, वर्षा गायकवाड यांनी न्यायालयाचा निर्णय न वाचताच एक भडकाऊ विधान केले आहे, ज्याचा तीव्र निषेध केला पाहिजे. गायकवाड यांनी १९ वर्षांच्या तुरुंगवासात या पीडितांच्या दुःखाबद्दल सहानुभूती दाखवायला हवी होती.

माजी आमदार सपा नेते अधिवक्ता युसूफ अब्राहानी म्हणाले की, वर्षा गायकवाड यांनी न्यायालयाचा निर्णय न समजून असे विधान करून मुस्लिमविरोधी भावना दाखवल्या आहेत, ज्यामुळे त्यांची भगवी मानसिकता उघड होते. इश्तियाक खान (अल-अन्सार फाउंडेशन) म्हणाले की, वर्षा यांचे विधान हे आरएसएस प्रवक्त्यासारखे आहे, तर ती मुस्लिमांच्या मतांनी जिंकली.त्यांनी त्यांच्या मतदारांचा विचार करायला हवा होता, कारण न्यायालयाने या तरुणांची निर्दोषता स्वीकारली आहे. मुस्लिम समाजातील मान्यवर नेत्यांनी वर्षा गायकवाड यांच्याप्रति नाराजी व्यक्त केली आहे.

# आज मुंबईतील समुद्रात उंच लाटांचा इशारा

**मुंबई:** मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना आज २७ जुलै रोजी उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोडक सागर, मध्य वैतरणा आणि तानसा या धरणांतून अनुक्रमे ४४८८.२५, २०१२.६७ आणि ३३१५.२५ क्युसेक इतका विसर्ग शुक्रवारपासून सुरू आहे. आपत्तीच्या अनुषंगाने प्रशासनातर्फे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना संभाव्य आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून सांगण्यात आले आहे. राज्यात रायगड, रत्नागिरी, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली या सहा जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट परिसरात गेल्या २४ तासांसाठी रेड अलर्ट देण्यात आला होता.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर सुचना**

२२/२२ के.व्ही. सोनारपाडा स्विचींग स्टेशन मधून निघणा-या खालील वाहिन्या देखभाल व दुरूस्तीचे कामाकरिता दि.२८.०७.२०२५ रोजी खाली दिलेल्या वेळेत बंद राहणार असुन या काळात कल्याण (पूर्व) विभागामधील खालील परिसरातील विद्युत पुरवठा पुर्णपणे बंद राहील याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व म.रा.वि.वि.कंपनीस सहकार्य करावे ही विनंती.

| वाहिनीचे नाव | वेळ | प्रभावित क्षेत्र |
|---|---|---|
| २२ के.व्ही.आर.एल. झोन वाहिनी क्रं. ३०६ | १०.०० ते १४.०० | आर.एल. झोन फेज २ परिसर |

**कार्यकारी अभियंता, कल्याण (पूर्व) विभाग**



**मध्य रेल्वे**

**आयपी व्हिडियो सर्वेलंस सिस्टीम बसविणे**

**कामाचे नाव :** ईएमयू/मेमू/डेमू कोचेसमध्ये आयपी आधारित व्हिडियो सर्वेलंस सिस्टीम बसविणे. **परिमाण:** दरांच्या अनुसूचीनुसार. **निविदा समाप्ती/ उघडण्याचा दिनांक आणि वेळ :** २१/०८/२०२५ रोजी १२:०० वा. पर्यंत. निविदा तपशिल आणि निविदा कागदपत्रे **www.ireps.gov.in** संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा केवळ संकेतस्थळाद्वारे ई-निविदाकरण स्वरूपातच स्वीकारण्यात येतील.
**ई-निविदा सूचना क्र. आरआर/पीआर/डब्ल्यूसी/२०८४/२५-२६/५४**
Sai/300
**रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है**



**मध्य रेल्वे**

**संकेतन आणि विविध अन्य कामे**

विभागिय रेल्वे व्यवस्थापक (एस आणि टी), १ ला मजला, पार्सल ऑफिस बिल्डींग, पी.एफ. क्र. १४ आणि १५ वर, मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ४००००१ भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने खालील कामासाठी नामांकित कंत्राटदारांकडून मागवित आहेत. निविदेच्या सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ १२/०८/२०२५ रोजी १५.०० वा. पर्यंत आहे आणि त्याच दिवशी १५.१५ वा. उघडण्यात येतील. **(१) निविदा सूचना क्र. सीआर/बीबी/एस आणि टी/पूर्व/२०२५/४०. कामाचे नाव :** पनवेल – रोहा अनुभागामधील रसायनी रेल्वे स्थानकापासून मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.च्या पर्यंत पीओएल लोडिंग टर्मिनलच्या बांधकामाच्या संदर्भात संकेतन काम. **अंदाजे मूल्य:** रु. ९.९७ कोटी. **इरठे:** रु. ६४८६००/- **उघडण्याचा दिनांक :** १२/०८/२०२५ **वैधता:** ६० दिवस. **पूर्तता कालावधी:** १२ महिने. **(२) निविदा सूचना क्र. सीआर/बीबी/एस आणि टी/पूर्व/२०२५/३८. कामाचे नाव :** मध्य रेल्वेच्या तळोजा पंचानंद स्थानक आणि डब्ल्यूडीएफसीच्या न्यू निळजे दरम्यान थेट कनेक्टीव्हिटीची तरतूद. **अंदाजे मूल्य:** रु. २.२९ कोटी. **इरठे:** रु. २६४८००/- **उघडण्याचा दिनांक :** १२/०८/२०२५ **वैधता:** ६० दिवस. **पूर्तता कालावधी:** १२ महिने. सदर निविदा सार्जनिक प्रापण धोरण आदेश दिनांकित १५/०६/२०१७ अंतर्गत मान्यताप्राप्त आहे. निविदेचा पूर्ण तपशील मध्य रेल्वे अधिकृत संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे. निविदा कागदपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील निविदेचा पूर्ण तपशील विभागिय रेल्वे व्यवस्थापक (एस आणि टी) ह्यांचे कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ४००००१ ह्यांच्या **सूचना फलकावर** देखी उपलब्ध आहे.
Sai/308
**रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है**



महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित


**इ-निविदा सूचना**
**क्र.ना.औ.वी.कें/२०२५-२६/३६**

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३००००५९९८७ / टीएम २ | टीएम २ येथे आवश्यकतेनुसार इओटी क्रेन (८०/२०टी) च्या इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल दुरूस्तीसाठी कामाचे कंत्राट. | ३,९९,३३६/– / ७,५००/– |
| २. | ३००००६००२७ / सिव्हिल | एकलहरे येथील पॉवर हाऊस परिसरात पावसाळयाच्या दृष्टीने मृत जनावरे उचलणे आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या नाल्याची देखभाल करणे. | २,२९,१५०/– / ५,८००/– |
| ३. | ३००००६०१४१ / टिएम | संच ३,४,५ च्या ओव्हरहॉलिंग दरम्यान आवश्यकतेनुसार तंत्रज्ञांच्या सहाय्यासाठी कामाचा करार. | ३,२१,७७२/– / ६,७१७/– |
| ४. | ३००००६०२१२ / सीएचपी | सीएचपी २ येथे स्टॅकर रिक्लेमर बकेटस्‌ची रचना, पुरवठा, उभारणी आणि कार्यान्वित करणे. | ४५,५०,०००/– / ४९,०००/– |
| ५. | ३००००६०२४६ / आय ॲन्ड सी | संच क्र ३,४ आणि ५ साठी हायड्रास्टेप (ड्रम लेव्हल इंडिकेटर) प्रणालीसाठी स्पेअर्सची खरेदी. | ७,९०,८८०/– / ११,४१०/– |
| ६. | ३००००६०२८० / एम एस ए | मेजर स्टोअरमध्ये रेकॉर्ड ठेवण्याच्या दैनंदिन कामासाठी द्विवार्षिक करार. | ३७,६९,९०६/– / ४१,२००/– |
| ७. | ३००००६०२५९ / ओडीपी | संच ३,४ आणि ५ येथिल कूलिंग टॉवर फॅन्ससाठी फॅन ब्लेड व ड्राइव्ह शाफ्टचा पुरवठा. | ४५,६७,९२०/– / ४९,१८०/– |
| ८. | ३००००६०३२५ / सिव्हिल | कॉलनीतील रूग्णालय इमारतीला बाह्य रंगकाम पुरवणे आणि लागू करणे. | ४,१९,८०५/– / ७,७००/– |
| ९. | ३००००६०३३२ / डब्ल्युटीपी | सॉल्ट लगून, लगून फिल्टर व सम्प आणि क्लॅरिफायरच्या चेंबर व चॅनेलमध्ये साचलेला कच्चा माल स्वच्छ करणे, काढणे व स्थलांतरित करण्यासाठी कामाचे कंत्राट. | १४,७९,१९०/– / १८,२९५/– |
| १०. | ३००००६०२१३ / ईएम | ईपीएबीएक्स प्रणालीसाठी वार्षिक करार. | २,०२,२२४/– / ५,५३०/– |
| ११. | ३००००६०३५३ / सीएचपी | सीएचपी वॅगन टिपलर इलेक्ट्रॉनिक वे ब्रिज, रोड वे ब्रिज आणि कन्व्हेयर वे ब्रिज यंत्राच्या देखभाल, सर्व्हिसिंग, स्टॅम्पिंग आणि पुर्नपडताळणीसाठी वार्षिक कामाचा करार. | १४,३४,७९०/– / १७,९००/– |
| १२. | ३००००६०३७० / बीएम | कोळसा मिल एक्स आर पी –७६३ साठी मिल टॉप व्हेंच्युरी असेंम्बलीचा पुरवठा. | ४९,९४,०००/– / ५३,४४०/– |
| १३. | ३००००६०३८७ / सीएचपी | चौदा आसनी दोन स्कुलबस भाडयाने घेणे. | १६,२९,५५०/– / १९,८००/– |
| १४. | ३००००६०३८५ / बीएम | बंद असलेल्या कोराडी टीपीएस २१० मेगावॅटच्या युनिट क्रमांक ७ आणि भुसावळ टीपीएसच्या युनिट क्रमांक २ मध्ये आधीच स्थापित केलेले कोळसा गिरणी, फीडर, आयडी, एफडी, पीए फॅन स्पेअर्स आणि बॉयलर साईड स्पेअर्सचे विघटन आणि एनटीपीएस येथे लोडिंगचे काम. | २३,७८,८८४/– / २७,३००/– |
| १५. | ३००००६०३९० / बीएम | एम एस प्लॅटफॉर्म ग्रिल्सच्या दुरूस्ती/ रिफिटिंगसाठी वार्षिक कामाचा कंत्राट. | २३,२९,४४६/– / २६,८००/– |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
प्रत्येक निविदा किंमत रू. ११८०/- , अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया
https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे

आमचा आजचा धर्म, मूळी धर्मच नव्हे.
प्रचलित भिक्षूकशाही धर्म म्हणजे बुळया बावळया खुळयांना झुलवून भटाची तुंबडी भरणारे एक पाजी थोतांड आहे.



- प्रबोधनकार ठाकरे


वृत्तमानस

मुंबई, रविवार, २७ जुलै २०२५


**२७-०७-२०२५ ते ०२-०८-२०२५ (रविवार ते शनिवार)**




**मेष - यश मिळवु शकाल.**
ग्रहसंकेतपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना यशाचे प्रमान वाढते राहील.हा सर्व दिवसांचा कालावधी जेमतेम बरा राहु शकेल.या कालावधीत कोणतीही गोष्ट करताना भान ठेवावे लागेल.कदाचित नुकसानही या कालावधीत होऊ शकते.त्यामुळे सतर्क राहून काम करने बरे.तसा दिवसांचा कालावधी बरा असेल.पूर्वीचे व्यवहार करणे बाकी होते ते व्यवहार मार्गी लागु शकतील.कौटुंबिकस्तरावर गोड बोलत जाणे पोषक ठरेल.२८चाकन्येतला मंगळबदल बरा असेल. व्यवसायात अनेक मार्गांतून आलेले प्रस्ताव चांगले असु शकतील. नोकरदार कामाच्या बाबतीत जबाबदारी पार पाडाल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या बचत करणे योग्य राहु शकेल. समाजसेवेची आवड राहील.संततीसौख्य लाभेल.नातेवाईकांशी कार्यक्रमानिमित्त भेटीगाठी होऊ शकतील.
**विद्यार्थी -** प्रकृती ठीकठाकअसेल.
**शुभदिनांक-३०-३१-०१.**

**वृषभ - रागावर नियंत्रण ठेवावे लागेल.**
ग्रहसंकेत पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल. नियोजित काम करतांना नाहक ओढातान होऊ शकेल.ग्रहांची साथ तितकिसी नसेल.सध्या कोणत्याही कामाला उशीर हा ठरलेलाच असेल.कामे अगदी वेळेत पूर्ण होनार नाहीत,त्यामुळे तुम्हाला नाहक चिचिडिचा सामना करावा लागेल. कोणतेहीकाम करायला गेलात आळसामुळे होणार नाही.कामातील उत्साह वाढवावा लागेल.इतरांची मदत वेळेत मिळेलच असे नाही.प्रत्येक गोष्टीत करावी लागणारी धावपळ वाढणारआहे.मंगळबदल आहारनियंत्रण सुचवतोय. व्यवसायात प्रगतीचे प्रमान कमी होऊ शकेल.नोकरदार कामास ज्यादा वेळ काढावा लागेल.उपासना वाढवावी.
**महिला -** आर्थिक नियोजन मार्गी लावावे लागेल. संततीचे लाड जपुन करावेत.शिस्त बिघडू देऊ नका.घरगुती वाता वरण बरे राहील.मानसिक समाधान शोधावे लागेल.
**विद्यार्थी -** आरोग्य नरम राहील.
शुभदिनांक-३१-१-२.

**मिथुन - लाभ संभवत आहेत.**
गिरहसंकेतपहाता सप्ताहाचा पूर्वार्धचांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना उत्साह वाढता राहु शकेल.शुभ ग्रहांची साथ बर्यापैकी आहे.बऱ्याच दिवसांपासून वाट प हात होता अशा गोष्टींचे चांगले संकेत संकेत मिळत आहे त.सध्याचे दिवस बरेआहेत असे म्हणायला हरकत नाही. ज्यावेळी सप्ताहात असे ग्रहमान असते अशा सप्ताहात एक संधी सोडायची नाही हे लक्षात ठेवावे.प्रस्तावाचा सकारात्मक विचार केलेला बरा.यशासाठी फार वेळ लागणार नाही.कामे पूर्ण होतील.मंगळबदल बरा असेल.व्यवसायिकदृष्ट्या विशेष धावपळ होणार नाही.नोकरदार वर्गाला कामाच्या बाबतीत होणारा त्रास दूर होईल.
**महिला -** आर्थिक बाबतीत समाधानाची परिस्थिती असु शकेल.महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा होऊ शकेल.धार्मिक गो
ष्टींत उत्साहअसला तरी करण्यासाठी वेळ नसनार.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे असेल.
**शुभदिनांक-२७-२८-२९.**

**कर्क - लाभात चांगली वाढ होईल.**
ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह अनुकुल जाऊ शकेल.नियोजित कामे कतांना समीकरण जुळून येऊ शकतील.या सर्व दिवसांचा कालावधी अतिशय उत्तम राहु शकेल.या कालावधीत जे काही करणार आहात त्या गोष्टीला नक्की चांगले यश मिळु शकेल.कारण एका दगडात दोन पक्षी मारण्याचा डाव साध्य होणार आहे.ही संधी बऱ्याच दिवसांतून आलेली आहे.सध्या सर्व समीकरण जुळून येणारे आहे.कौटुंबिकस्तरावर आनंदाला उत्तम चालना मिळेल.प्रतिष्ठेत वाढहोईल.मंगळबदल वाद टाळन्यास सुचवतो आहे.व्यवसायातील डावपेच अचूकतेने यशस्वी होऊ शकतील.
नोकरदार काम नेहमीप्रमाने सुरळीत चालू राहु शकेल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या बचत करण्याचा प्रयत्न सफल होईल कौटुंबिक वैवाहीकजीवन सुखाचे राहु शकेल.पतीचे सहकार्य लाभु शकेल.मानसिक समाधान लाभु शकेल.
**विद्यार्थी -** प्रकृती उत्तम साथ देईल.
**शुभदिनांक-२८-२९-३०.**

**सिंह - व्यवहारात हलगर्जी नसावी.**
ग्रहबळ पहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना दुर्लक्ष होऊ देऊ नये.या दिवसांच्या कालावधीत कोणतीही घाई करून निर्णय घ्यायचे नाहीत हे लक्षात ठेवावे लागेल.अन्यथानुकसान होऊशकते. अनोळख्या व्यक्तीवर अजिबात विश्वास ठेवू नका. कौटुंबिकस्तरावर वावरतांना वादविवाद या गोष्टींपासून जरा लांबच राहाणे बरे.प्रत्येक गोष्टीत आपले तेच खरे करूनका.समोरच्याचे ऐकून घेण्याची मानसिकता जरी नसली तरी ती वेळेवरच करूनघ्यावी लागेल.मंगळबदल बरा असेल.व्यवसायात फार मोठी गुंतवणूक करू नका.नोकरदार वर्गाला कामात बदल करावे लागतील.उपासना सोडु नका.
**महिला -** आर्थिक बाबतीत व्यवहार चोख ठेवावेत.मित्र-मैत्रिणींचे सहकार्य मिळवावे लागेल.कुटुंबाची काळजी घ्या. जोडीदाराचा आदर करावा लागेल.मनमानी करु नका.
**विद्यार्थी -** प्रकृती स्वास्थ्य जपलेले बरे.
**शुभदिनांक-३०-३१-१.**

**कन्या - संमजसपना-संयम उपयोगी पडेल.**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे कपतांना उगाचच चिडचिड करुन नुकसान ओढवुन घेऊनका.कौटुंबिकस्तरावर वावरतांना विनाकारण मतभेद ताणू नका.हा सर्व कालावधी फारसा अनुकूल नाही.हेविसरु नका. तेव्हा घाईगडबडीने कोणती गोष्ट करायला जाऊ नका.इतरांनी काय करावे काय करू नये सल्ला देऊ नका.हा सल्ला अंगलट येईल.मंगळबदल बरा असेल. एखादी गोष्ट तुम्ही प्रत्यक्षात पाहात नाही तोपर्यंत त्या गोष्टीवर प्रतिक्रिया देऊ नका.खरेदी करताना भान ठेवावे. व्यवसायात खरेदी-विक्रीचे व्यवहार करताना मागील अनुभव विसरू नका.नौकरदार आहेत्यात समाधान मानावे.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या व्यवहार जपून करावेत.कौटुंबिक मतभेद उगाचच आणू नका.जोडीदाराच्या सल्ल्याने पुढे जाणे पोषक राहील,मानसिक ताण तणाव घेऊ नका.
**विद्यार्थी -** प्रकृतीची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-३१-१-२.**

**तूळ - उत्साहात वाढ होऊ शकेल.**
ग्रहबळ पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना हळुहळु यशात वाढ होऊशकेल.या कालावधीत कदाचित द्विधावस्था निर्माण होऊ शकते,त्यामुळे कोणतेही निर्णय घाईने घेणे जमणार नाही.त्यापेक्षा याकालावधीत निर्णय न टाळलेले चांगलेहोऊ शकेल. तरिसुध्दा हे सर्व दिवस अतिशय उत्तम असु शकतील.या कालावधीत विचारकरुन निर्णय घेतल्यास यशस्वी होतील.रखडलेली कामे पूर्ण होऊ शकतील.कौटुंबिकस्तरावर प्रतिसाद मिळु शकेल. मंगळबदल भावनाप्रधान बनवेल. व्यवसायात फायद्याचे प्रमाण बर्यापैकी चांगले राहील.नोकरदार वर्गाला वरिष्ठांकडून कौतुकाची थाप मिळु शकेल.
**महिला -** आर्थिक प्रश्नचांगले सुटु शकतील.राजकीय क्षेत्रात यश मिळु शकेल.जेवढ्यास तेवढे राहावे.नातेवाईकांशी संवाद साधावा लागेल. नातेसंबंध सुधारु शकतील.
**विद्यार्थी -** आरोग्य ठीक राहील.
**शुभदिनांक-२७-२८-२९.**

**वृश्चिक - प्रगती करु शकाल.**
ग्रहबळ पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना भरीव सफलता मिळवु शकाल.या सर्व दिवसांचा कालावधी शुभदायक राहु शकेल.काही वेळेला आपण जरी ठरवले की समोरच्याशी जेवढ्यास तेवढे राहायचे तरनेमके चांगल्या कालावधीत ही समोरचे लोक खूप आदराने वागतात.त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो व भावनेच्या आहारी जाऊन सर्व काही बोलून रिकामे होतात.व या गोष्टी परत पुढे येतात.यादिवसात चांगलेच यशमिळेल.मंगळबदल पराक्रमास पोषक असेल.व्यवसायात नफ्याचे प्रमाण भरपूर चांगले राहु शकेल. नोकरदार वर्गाचे कामातील नियोजन यशस्वी होऊ शकेल.
**महिला -** आर्थिक लाभअपेक्षेप्रमाने होतील.रखडलेली कामे यशस्वीपने मार्गी लावु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सौख्य व समाधानात अविस्मरणीय वाढ संभवते.
**विद्यार्थी -** आरोग्य उत्तम राहील.
**शुभदिनांक-२८-२९-३०.**

**धनू - उगाचच वाद वाढवु नका.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना आत्मविश्वास उपयोगी पडु शकेल.यादिवसांच्या कालावधीत धरलं तर चावतंय-सोडलं तर पळतंय अशी अवस्था होऊ शकेल.काय करावे काय करू नये हे कळणार नाही.कारण निर्णय नाही घेतला तरी त्रास होणार आणि घेतला तरी त्रास होणार.मागील अनुभव न विसरु नका. निर्णय चुकीचे होणार नाही.समाधान मिळेल,त्यासाठी उशीर लागणार आहे.तेव्हा दडपण घेऊन कामेकरू नका.मंगळबदल बहुतांशीआनंदी करु शकेल. व्यवसाय कदाचित अनपेक्षित लाभ होऊ शकतील. नोकरदार वर्गाचा कामातील व्याप बर्यापैकी वाढु शकेल.
**महिला -** उधारीचे व्यवहार टाळावेत.घरगुती वातावरण चांगले कसे राहील ते पाहावे लागेल.निरर्थक चर्चासत्र करत
बसुन अडचनिंना आमंत्रण देऊ नये.कटाक्षाने टाळावे.
**विद्यार्थी -** आरोग्याची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-३०-३१-१.**

**मकर - संघर्षाला समजुन घेणे बरे.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे कतांना मनमानी करु नये.सप्ताहातील सर्वच दिवस काळजीपूर्वक हाताळावे लागतील.इतरांवर अवलंबून कोणतीही गोष्ट साध्य होणार नाही.हे सदैव लक्षात ठेवावे.कौटुंबिकस्तरावर वावरतांना तर्कशुद्ध पद्धतीने विचार करत करत योग्य निर्णय घ्यावेत.प्रत्येक गोष्टीत एक घाव दोन तुकडे करून चालणार नाही.सध्या आपली डाळ शिजणार नाही.ज्या गोष्टीतून चांगले काही होणार त्याला प्राधान्य द्या. नकारात्मकता काढूनटाका.मंगळबदल पोषकअसेल. व्यवसायात चाललेल्या घडामोडीत जबाबदारीने पाऊल टाकावे लागेल.नोकरदार वर्गाने शांत राहून काम करावे.
**महिला -** आर्थिकबाबतीत उगाचच धाडसी निर्णय घेऊ नका. नातेवाईकांशी जेवढ्यास तेवढे राहावे लागेल.महत्वाच्या निर्णयात जोडीदाराची साथ मिळवावी लागेल.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्यावे.
शुभदिनांक-३१-१-२.

**कुंभ - समंजसपना अंमलात आणा.**
ग्रहप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना मिळतेजुळते घ्यावे लागेल.या कालावधीत जपून प्रत्येक पाऊल टाकावे लागेल.हे दिवस कसे अधिक चांगले घालवता येऊ शकतील.त्या दृष्टीने प्रयत्न करत चला.तुमचा राग वाढेल अशा गोष्टी तुमच्यासमोर या दिवसांत येऊ शकतात.तुमचा राग वाढू दे
ऊ नका.जी गोष्ट आवडत नाही-तीच समोर येणार असे असल्यामुळे चिडचिड होऊ शकते.यशस्वी कामासाठी थोडा उशीर लागेल. मंगळबदल लाभात वाढ करेल.व्यवसायात अविचाराने नको ते धाडस करू नका.नोकरदार वर्गाने आपले काम एके काम हे सूत्र लक्षात ठेवावे.
**महिला -** आर्थिक व्यवहार जपून करावेत.समाजमाध्यमांपासून लांब राहावे लागेल.मनोरंजनात आनंद मिळेल.
**विद्यार्थी -** आरोग्य बरे राहील.
**शुभदिनांक-२७-२८-२९.**

**मीन - उत्तम यश मिळवु शकाल.**
ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना जबाबदारी वागावेच लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदात चांगली वाढ होऊ शकेल.या सर्व दिवसांत येणारे प्रस्ताव यशस्वी असु शकतील. तरिसुध्दा जे काही करायचे आहे ते तुम्हाला शांत डोक्याने करायचे आहे.लाभात चांगली वाढहोऊ शकेल.शिवाय ज्या गोष्टीची कल्पना नाही अशा गोष्टिची चर्चा करत बसु नका.सल्ला देत बसू नका.सामाजिकस्तरावर प्रतिष्ठा वाढवु शकाल.मंगळबदल आनंदात उत्तम वाढकरु शकेल. व्यावसायिक यशस्वी बदल करावे लागु शकतील.नोकरदार वर्गाला नवीन यशस्वी कामाचा अंदाज येऊ शकेल.
**महिला -** मनमोकळेपणाने बोलल्यामुळे हलके वाटु शकेल. कौटुंबिकस्तरावर वावरतांना संततीचे सौख्य लाभु श केल. घरगुतीस्तरावर वातावरण आनंदी राहु शकेल.
**विद्यार्थी -** तब्येत ठणठणीत राहील .
**शुभदिनांक-२८-२९-३०.**

# उद्धव ठाकरे हिंदुत्वाचे खणखणीत नाणे!

योगेश वसंत त्रिवेदी

२०१९ च्या २८ नोव्हेंबरला जसे शिवसेना पक्षप्रमुख श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यासमवेत महाविकास आघाडी सरकारचे नेतृत्व स्वीकारले आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा आपल्या समर्थ खांद्यावर घेतली. तेव्हापासून भारतीय जनता पक्षाचे नेते अस्वस्थ झाले आणि त्यांनी उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्वाला तीलांजली दिल्याची कोल्हेकुई सुरु केली. ही कोल्हेकुई शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस हे दोन्ही पक्ष फोडून बेकायदेशीरपणे सत्तेवर येऊन तीन वर्षे झाली तरी अद्यापही सुरुच आहे. जळी स्थळी काष्ठी पाषाणी जसे संताजी- धनाजी दिसत होते, तद्वतच या लोकांना सकाळ दुपार संध्याकाळ आणि रात्री सुद्धा जागेपणी झोपल्यावर ही उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि आदित्य उद्धव ठाकरे दिसत आहेत. मग जनाब, मौलाना अशी बिरुदावली लावायलाही मागे पुढे पहात नाहीत. खरं पहायला गेलो तर १९८७ च्या विलेपार्ले येथील महाराष्ट्र विधानसभेच्या पोट निवडणुकीत शिवसेनेचे डॉ. रमेश प्रभू यांच्या निवडणुकीच्या निमित्ताने शिवसेनेने सर्वप्रथम हिंदुत्वाचा मुद्दा घेतला आणि या निवडणुकीत विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने शिवसेनेच्या डॉ. रमेश प्रभू यांना समर्थन दिले होते आणि भारतीय जनता पार्टीने जनता दलाच्या प्राणलाल व्होरा यांना पाठिंबा दिला होता. शिवसेना या निवडणुकीत जिंकली. कॉंग्रेसचे पराभूत उमेदवार प्रभाकर कुंटे यांनी शिवसेनेच्या डॉ. रमेश प्रभू यांच्या विरोधात निवडणूक याचिका दाखल करतांना हिंदुत्वाचा प्रचार धर्माच्या आधारे केल्यामुळे शिवसेनेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. परिणामी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे आणि डॉ. रमेश प्रभू या दोघांना सहा वर्षांसाठी मतदानापासून वंचित ठेवण्यात आले. डॉ. रमेश प्रभू यांची आमदारकी रद्द ठरविण्यात आली. हिंदुत्वासाठी ही किंमत शिवसेना, शिवसेनाप्रमुख आणि डॉ. रमेश प्रभू यांना मोजावी लागली. भाजपचे चाणक्य प्रमोद महाजन यांना या निवडणुकीमुळे हिंदुत्वाचे कार्ड चालू शकते अशी उपरती झाली आणि मग त्यांनी शिवसेनेबरोबर हिंदुत्वाच्या मुद्द्यावर युती केली. १९९० च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना भाजप युती करण्यात आली. या वेळीही राजकारणाचे छक्के पंजे न समजणाऱ्या साधे सरळ वागणारे बाळासाहेब ठाकरे यांना प्रमोद महाजन यांनी विधानसभेच्या २८८ जागांपैकी शिवसेनेला १७१ जागा देण्याचे औदार्य दाखवून आणि स्वतः ११७ जागा लढवितांना जिथे शिवसेना जास्त जागा जिंकू शकते अशा विदर्भात कमी आणि जिथे काहीच उपयोग नाही अशा पश्चिम महाराष्ट्रात जास्त जागा दिल्या. परिणामी जास्त जागा लढविणाऱ्या शिवसेनेला ५२ जागा जिंकता आल्या तर कमी जागा लढविणाऱ्या भाजपने ४२ जागा पदरात पाडून घेतल्या. थोडक्यात सत्ता हुकली परंतु त्यानंतर ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येतील बाबरी मशीद धराशायी झाल्यावर पत्रकारांनी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते सुंदर सिंह भंडारी यांना, "बाबरी किसने गिराई ?" असा प्रश्न विचारला तेंव्हा त्यांनी सरळसरळ काखा वर केल्या आणि "नहीं वह बीजेपी के नहीं थे, आरएसएस के नहीं थे, बजरंग दल के नहीं थे, व्हीएचपी के नहीं थे" असे उत्तर दिले. तेंव्हा पुन्हा विचारणा केली की फिर वह कौन थे ? त्यावर "वे शायद शिवसेना के होंगे !" असे सांगितले. याच वेळी वांद्रे येथील कलानगर मातोश्री येथून हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे या अस्सल वाघाने डरकाळी फोडली आणि सुस्पष्ट शब्दांत सुनावले की, बाबरी उद्ध्वस्त करणारे जर माझे शिवसैनिक असतील तर मला त्यांचा अभिमान आहे, गर्व आहे. याच वेळी ठाणे जिल्हा प्रमुख धर्मवीर आनंद दिघे यांनी "गर्व से कहो हम हिंदू है" असे लिहिलेली हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या छायाचित्र असलेले बाबरी उद्ध्वस्त होतांनाची दिनदर्शिका प्रकाशित केली. त्यावर बंदी घालण्यात आली. हिंदुत्वासाठी नेहमीच बाळासाहेबांनी स्वतः नमते घेत भारतीय जनता पक्षाला मोठेपणा दिला. इतकेच काय तर अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान असतांना २००२ साली गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर गोध्रा प्रकरणी वक्रदृष्टी करताच हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांनी, "मोदी को हात मत लगाओ, मोदी गया तो समझो गुजरातसे भाजप गया", असा सुस्पष्ट निरोप लालकृष्ण अडवाणी यांच्या मार्फत अटलबिहारी वाजपेयी यांना दिला. ही चित्रफीत /ध्वनी फीत अजूनही गुजरातमध्ये कोणत्याही निवडणुकीमध्ये वाजविण्यात येते. त्याच सुमारास शंकरसिंह वाघेला हे भारतीय जनता पक्ष सोडून शिवसेनेत यायला आणि शिवसेनेचे गुजरातचे मुख्यमंत्री व्हायला तयार झाले होते. मातोश्री येथे येऊन वाघेला यांनी ही आर्जवे केली. परंतु आम्ही वाघ आहोत, वाघेला नव्हेत, असे ठणकावून सांगत नरेंद्र मोदी यांची पाठराखण केली होती. सातत्याने भारतीय जनता पक्षाला साथ दिली आणि दिल्ली तुम्ही सांभाळा आम्ही महाराष्ट्र सांभाळतो, आपण दोघे मिळून राष्ट्र आणि राज्य चालवू, अशी सामंजस्याची भूमिका घेतली. २०१२ पर्यंत व्यवस्थित सुरू होते प्रमोद महाजन यांची दुर्दैवी हत्या झाली. १७ नोव्हेंबर २०१२ रोजी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांचे महानिर्वाण झाले. २०१३ साली नरेंद्र मोदी यांचे नांव भारतीय जनता पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून मुक्रर झाले. २०१४ साली लोकसभेच्या निवडणुका झाल्या आणि २६ मे २०१४ रोजी नरेंद्र दामोदरदास मोदी हे पंतप्रधान झाले. भारतीय जनता पक्षाचे २८२ खासदार निवडून आले, भारतीय जनता पक्षाचे बहुमत असतांनाही केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. दुर्दैवाने ३ जून २०१४ रोजी गोपीनाथ मुंडे यांचे देहावसान झाले. इथेच माशी शिंकली. मुंडे यांनी ज्या देवेंद्र फडणवीस यांना भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष केले त्यांच्या हाती महाराष्ट्र भाजपाची सर्व सूत्रे आली. २४ सप्टेंबर २०१४ रोजी पक्षश्रेष्ठींनी सांगितल्याप्रमाणे एकनाथ खडसे यांनी शिवसेनेबरोबरची पंचवीस वर्षे जुनी युती तोडण्याची घोषणा केली. श्रेष्ठींच्या सांगण्यावरुन आपल्याला ही घोषणा करावी लागल्याची कबुली एकनाथ खडसे यांनी दिली आहे. ऑक्टोबर २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुका शिवसेना, भारतीय जनता पक्ष, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस यांनी स्वतंत्रपणे लढविल्या आणि श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे हे अभिमन्यू प्रमाणे एकटेच लढले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, आनंदीबेन पटेल, सोनिया गांधी, मनमोहन सिंह, राहुल गांधी, शरद पवार, देवेंद्र फडणवीस आदी सर्वच नेत्यांना अंगावर घेऊन एकहाती ६३ जागा जिंकल्या. नरेंद्र मोदी यांची लाट होती. तरीही भारतीय जनता पक्षाच्या वाट्याला १२३ जागा आल्या. उठता बसता शरद पवार यांच्या नांवे बोटे मोडणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे अल्पमतातले सरकार शरद पवार यांनी वाचविले. १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ पर्यंत शिवसेनेचे एकनाथ संभाजी शिंदे हे विरोधी पक्षनेते होते. २२ वर्ष बदनामी सहन करावी लागली नाही तितकी २२ दिवस बदनामी सहन करावी लागली असे सांगत ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी अल्पमतातील सरकारचे मुख्यमंत्री झालेल्या देवेंद्र गंगाधर फडणवीस यांनी चंद्रकांतदादा पाटील आणि धर्मेंद्र प्रधान यांना मातोश्रीच्या दारात पाठवून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना आपली खुर्ची पाच वर्षे अबाधित राहण्यासाठी पाठिंबा मागितला. उद्धव ठाकरे यांनी मनाचा मोठेपणा दाखवून पाठिंबा दिला. शिवसेना भारतीय जनता पक्षाच्या सरकारात सहभागी झाली. उद्या आमची सत्ता आल्यास आमच्या लोकांना अनुभव मिळेल आणि तसेही आम्ही रस्त्यावर लढणारे लढवय्ये असून आम्ही जनतेशी बांधिलकी ठेवून आहोत, ही भूमिका उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केली. २०१४ आणि २०१९ या दोन्ही विधानसभा निवडणुकीत शिवसेना एकटी लढणार अशी स्पष्ट भूमिका घेणाऱ्या उद्धव ठाकरे यांना भारतीय जनता पक्षाने सोबत येण्यासाठी गळ घातली म्हणून उद्धव ठाकरे तयार झाले. १८ फेब्रुवारी २०१९ रोजी सुद्धा अमित शाह मुंबईत आले. सॉफिटेल, मातोश्री येथे बंद दाराआड उद्धव ठाकरे यांच्या समवेत चर्चा केली. या चर्चेच्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दाराबाहेर बसून होते. वरळीच्या ब्ल्यू सी हॉटेल मध्ये भरगच्च पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे आणि अमित शाह यांच्या उपस्थितीत देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्या सर्वच मागण्या मान्य केल्याचे सांगतांना जबाबदाऱ्या ५०-५०% मान्य असल्याची, नाणार जाणार अशी घोषणा केली. लोकसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे ३०३ खासदार निवडून आले. शिवसेनेचेही १८ खासदार निवडून आले. महायुती जबरदस्त पुढे आली. संपूर्ण महाराष्ट्र जसा नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी ढवळून काढला तद्वतच उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंच्या घणाघाती सभा सुद्धा सर्वत्र झाल्या. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे ५६ आणि भारतीय जनता पक्षाचे १०५ आमदार निवडून आले. परंतु १८ फेब्रुवारी २०१९ रोजी अमित शाह यांनी दिलेला शब्द मोडण्यात आला. सत्तासंपादनाचे गुऱ्हाळ सुरुच होते. शिवसेना समर्थन देत



नाही तोवर सरकार बनविणार नाही असे म्हणणाऱ्या भारतीय जनता पक्ष नेत्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते अजितदादा पवार यांना सोबत घेऊन २३ नोव्हेंबर २०१९ च्या सक्काळी सक्काळीच राजभवनावर जाऊन शपथविधी उरकून घेतला. बऱ्याच घडामोडी घडल्या. पाच वर्षे उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्यावर मुख्यमंत्री राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या नांवे ८० तासाचे मुख्यमंत्री होण्याचीही नोंद झाली. कारण अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे स्वीकारली नाहीत. भारतीय जनता पक्षाने विश्वासघात केल्यानंतर श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे हे महाविकास आघाडी सरकारचे मुख्यमंत्री झाले. संकटे एकापाठोपाठ एक येऊ लागली. कोरोना महामारीने उच्छाद मांडला. स्वतः उद्धव ठाकरे यांच्यावर इस्पितळात दाखल होण्याची वेळ आली. अवघड शस्त्रक्रिया करण्यात आली. तरीही कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस व मित्र पक्षांसोबत सर्वोत्तम कामगिरी केली. आपल्या वाहन चालविणाऱ्या सारथ्याला कोरोना होऊ नये म्हणून स्वतः मोटार चालवत पंढरीच्या पांडुरंगाच्या शासकीय महापूजेचे महत्कार्य केले, १ मे रोजी हुतात्मा चौकातही स्वतः मोटार चालवत हुतात्म्यांना अभिवादन केले. देश पातळीवर एकदा दोनदा नव्हे तर चक्क चार वेळा पहिल्या पाच मुख्यमंत्र्यांमध्ये गणना झाली, ज्यात भारतीय जनता पक्षाचे एकही मुख्यमंत्री नव्हते. अनाथांची माय म्हणून ओळखण्यात येणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांनी तोंडभरून मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे कौतुक करतांना बाळासाहेब ठाकरे आणि मीनाताई ठाकरे यांचे संस्कार तुझ्यात आहेत, बाळा उद्धव, तू यशस्वी निश्चितच होशील, असा आशीर्वाद दिला. भारतीय जनता पक्षाने या काळात सर्वच प्रथा परंपरा मोडीत काढून शिवसेनेला जबाबदार विरोधीपक्ष म्हणून साथ देण्याऐवजी त्रास देण्याचेच काम केले. आणखी पराकोटीला जात शिवसेना फोडण्याचे लोकशाहीचा गळा घोटण्याचे अश्लाघ्य काम केले आणि मग माझा एक जरी सहकारी विरोधात उभा राहिल्यास मी पदावर राहणार नाही, असे मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी ठणकावून सांगितले. मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला आणि वर्षा निवासस्थान क्षणार्धात सोडून रात्रीच्या रात्री मातोश्री येथे येणे पसंत केले. अख्खा महाराष्ट्र हळहळला. महाविकास आघाडी सरकार चांगले चालत असतांना चालत्या गाडीला खीळ घातली गेली. तीन वर्षे तीच तीच ध्वनीफीत/चित्रफीत वाजविण्यात येत आहे. स्वतः गोल टोप्या घालून सीरकुरमा ओरपणाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांच्या सह तमाम शिवसेनेला बदनाम करण्याचा विडा उचललाय. परंतु सुब्रह्मण्यम स्वामींपासून तो ज्योतिर्पीठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे हे खरे हिंदुत्ववादी असल्याचा निर्वाळा दिला आहे. शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी उद्धव ठाकरे यांचा विश्वासघात झाला असून ते पुन्हा मुख्यमंत्री होईस्तोवर हे दुःख दूर होणार नाही, असे ठणकावून सांगितले. उद्धव ठाकरे यांचा विश्वासघात करणारे हिंदू असूच शकत नाही, असेही त्यांनी ठासून सांगितले. शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांचे मातोश्री येथे विधिवत पाद्यपूजन करुन श्री. उद्धव ठाकरे, सौ. रश्मी उद्धव ठाकरे, आदित्य आणि तेजस ठाकरे या संपूर्ण परिवाराने आशीर्वाद घेतले. उद्धव ठाकरे यांचे आणि त्यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे हिंदुत्व कसे खणखणीत आहे, यावर धर्माचाऱ्यांकडून शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. त्यामुळे शिवसेनेला बाकी कुणाच्या प्रमाणपत्राची अजिबात गरज नाही. महाराष्ट्रात राहतो तो मराठी, गुजरात मध्ये राहतो तो गुजराती, बंगाल मध्ये राहतो तो बंगाली या न्यायाने हिंदुस्थानात राहतो तो हिंदू आमचे हिंदुत्व शेंडी जानव्याचे हिंदुत्व नाही आमचे हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व, ही हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९९० साली गिरगांव चौपाटी येथील शिवसेना भाजप युती च्या जाहीर सभेत सांगितलेली, मुंबई उच्च न्यायालयातील डॉ. मनोहर जोशी यांच्या निवडणूक खटल्यात वकील जय चिनॉय यांनी माझ्या तोंडून रेकॉर्ड वर आणलेली आणि ११ डिसेंबर १९९५ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे. एस. वर्मा यांनी डॉ. मनोहर गजानन जोशी यांना निर्दोष मुक्त करतांना मान्य केलेली हिंदुत्वाची व्याख्या महत्वाची आहे. हे सर्व पुन्हा एकदा विस्ताराने सांगण्याचे कारण म्हणजे भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या सहकाऱ्यांना विस्मृती होऊ नये. २०१४ ते २०१९ अशी पाच वर्षे श्री. उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्यावर टिकलेले भाजप सरकार भाजपचे नेते मानायला तयार नसले तरी ती वस्तुस्थिती आहे आणि सुंदरसिंह भंडारी यांनी काखा वर केल्यानंतर "जर ते शिवसैनिक असतील तर मला त्यांचा अभिमान आहे", अशी फोडलेली हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांची डरकाळी, त्याचा वारंवार श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे करीत असलेला पुनरुच्चार ही काळ्या दगडावरची भगवी रेषा आहे. भारतीय जनता पक्षाचे सौगात एक मोदी चालते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ मोहन भागवत सुमारे ८० मौलवींशी प्रदीर्घ चर्चा करतात. हे चालते पण उद्धव बाळासाहेब ठाकरे दोन्ही कॉंग्रेस बरोबर गेले की हिंदुत्व सोडल्याची बांग दिली जाते. श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे आपण बाळासाहेबांचे आणि माँ साहेबांचे सुपूत्र आहात आणि ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या मार्मिक, दैनिक सामना आणि दोपहर का सामनाचे संपादक आहात. शिवसेना पक्षप्रमुख म्हणून महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थान आपल्या नेतृत्वाची प्रतीक्षा करीत आहे, आता तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे आपले बंधूही सोबत आले आहेत. १९६६ पासूनचा शिवसैनिक बेलभंडार उचलण्यास सिद्ध झालेला आहे, शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांचा आशीर्वाद आहे. बाटग्यांच्या बांगेकडे लक्ष देण्याची गरज नाही, आपले हिंदुत्वाचे नाणे कसे खणखणीतच आहे. करा पुनश्च हरी ॐ. श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, आपणांस उदंड आयुष्य आणि ठणठणीत आरोग्य प्राप्त होवो या आई एकवीरा देवी आणि आई तुळजाभवानी मातेच्या चरणी विनम्र प्रार्थना...

**(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत.)**

## पनवेलमध्ये 'महारोजगार मेळावा'

**पनवेल :** आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी पनवेलच्या वतीने शनिवार दिनांक ०२ ऑगस्ट रोजी खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालयात 'महारोजगार मेळावा २०२५' आयोजित करण्यात आला आहे. या महारोजगार मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे असून, विविध क्षेत्रातील नामांकित व प्रतिष्ठित कंपन्या या मेळाव्यात मध्ये सहभागी होणार आहेत. रोजगाराच्या शोधात असलेल्या युवकांना या माध्यमातून प्रत्यक्ष नोकरीसाठी निवड होण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. या मेळाव्यामध्ये दहावी, बारावी, आयटीआय, पदविका, पदवीधर, पदव्युत्तर पदवीप्राप्त तसेच अकुशल उमेदवारही सहभागी होऊ शकतात. कंपन्यांच्या विविध विभागांमध्ये भरतीसाठी विविध प्रकारच्या पात्रता आणि क्षमतांनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हजारो रिक्त पदांवर भरती या मेळाव्यात होणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने राबवले जात आहेत. त्याच अनुषंगाने यंदाही महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले हे. या मेळाव्यात सहभागी व अधिक माहितीसाठी इच्छुक उमेदवारांनी ९९३००७४५८७ किंवा ९९२०७६५७६५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



### महत्त्वाचे

## नवी मुंबईच्या रिक्षांची जालन्यात विक्री

**नवी मुंबई :** नवी मुंबईतून चोरलेली रिक्षा जालना जिल्ह्यामध्ये विक्री केली जात होती. या प्रकरणात सीबीडी पोलिसांनी दोघांना अटक केली असून, नवी मुंबईच्या विविध भागांतील चोरलेल्या १२ रिक्षा हस्तगत केल्या आहेत. सीबीडी सेक्टर ११ मधून २८ मे रोजी रिक्षा चोरीला गेल्याचा गुन्हा सीबीडी पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आला होता. गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळ तसेच आजूबाजूच्या परिसरातील सुमारे ६० ते ६५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली होती. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे दोघे संशयित आरोपी निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी मुख्य आरोपी नाजिमोद्दीन काझी (४३) याला जालना जिल्ह्यातील परतूर येथून अटक केली. सखोल चौकशीत त्याचा साथीदार साकीब शेखला (२४) जालना येथून ताब्यात घेण्यात आले. दोघांनी सीबीडी, खारघर, कळंबोली, पनवेल परिसरातून १२ ऑटो रिक्षा चोरल्याची कबुली दिली.

## कल्याण शहराचा मंगळवारी पाणी पुरवठा बंद

**कल्याण** :कल्याण डोंबिवली पालिकेला पाणी पुरवठा करणाऱ्या मोहिली येथील जलशुध्दीकरण केंद्रात देखभाल दुरुस्ती आणि महावितरणचे वीज मीटर जोडणीचे काम मंगळवारी करावयाचे आहे. या कामांसाठी मोहिली जलशुध्दीकरण केंद्र येत्या मंगळवारी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे या जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा होणाऱ्या कल्याण शहराचा काही भाग ग्रामीण भागाचा पाणी पुरवठा मंगळवारी सकाळी दहा ते संध्याकाळी सहा या वेळेत बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घोडे यांनी दिली. मोहिली जलशुध्दीकरण केंद्र उल्हास नदीच्या काठावर मोहिली गाव हद्दीत आहे. या केंद्रातून पाणी पुरवठा होणाऱ्या मांडा, टिटवाळा, बल्याणी, बनेली, आंबिवली, शहाड, अटाळी आणि परिसरातील ग्रामीण भागातील काही गावे, याशिवाय कल्याण पश्चिमेतील ब प्रभाग हद्दीतील मिलिंदनगर, योगीधाम, चिकनघर, बिर्ला महाविद्यालय परिसर, म्हाडा कॉलनी परिसर, मुरबाड रस्ता, सिंडिकेट परिसराला होणारा पाणी पुरवठा मंगळवारी बंद राहणार आहे.

# कोल्हापूरच्या सर्वांगिण विकासासाठी शिवसेना कटिबद्ध!

## कोल्हापुरात शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

प्रतिनिधी

■ **कोल्हापूर**

कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाकडे शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बारीक लक्ष आहे. शिंदे साहेबांच्या नेतृत्वात महायुती सरकारने कोल्हापूरच्या विकासासाठी हजारो कोटींचा निधी दिला. यापुढेही कोल्हापूरला ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता आहे त्याची पूर्तता करु, अशी ग्वाही शिवसेनेच्या संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली. शिवसेना पक्षाच्या कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याहस्ते शनिवारी झाले. यावेळी ते



बोलत होते. या सोहळ्याला जिल्ह्याचे पालकमंत्री व सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार धैर्यशील माने, आमदार राजेश क्षीरसागर, आमदार चंद्रदीप नरके, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, आमदार अशोक माने, माजी खासदार संजय मंडलिक, माजी आमदार सुजित मिणचेकर, माजी आमदार जयश्री जाधव आणि जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले की, कोल्हापूरकरांनी शिवसेनेला भरभरुन प्रेम केले. इथल्या मतदारांनी महायुतीच्या १० पैकी १० जागा निवडून दिल्या. यात शिवसेनेचे पाच आमदार निवडून आले. या मध्यवर्ती कार्यालयाच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या सोडवता येतील. जिल्ह्यात मध्यवर्ती कार्यालय असावे अशी बऱ्याच वर्षांपासून कार्यकर्त्यांची मागणी होती. आज मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या माध्यमातून ती पूर्ण झाली, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

एकनाथ शिंदे साहेबांनी अडीच वर्ष राज्याचे नेतृत्व करताना महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी यांच्यासाठी अनेक निर्णय घेतले. लाडकी बहिण योजना आणली. कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मोठे निर्णय घेतले. अडीच वर्ष पायाला भिंगरी लावून फिरणारा मुख्यमंत्री पहिल्यांदा या महाराष्ट्राने पाहिला. या कामामुळेच सर्वसामान्यांचा विश्वास शिंदे साहेबांवर आणि शिवसेनेवर बसला, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. जेष्ठ नागरिकांना एसटीमध्ये मोफत प्रवासाची सवलत योजना लागू केली. सुरुवातीला या योजनेची खिल्ली उडवली गेली, मात्र या योजनेचा लाखो ज्येष्ठांनी लाभ घेतला. याबाबत पन्हाळा ते पावनखिंड या मोहीमे दरम्यान आपल्याला अनुभव आल्याचे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

### कर्नाळा बँकेचा 500 कोटींचा घोटाळा

# माजी आमदाराच्या १०२ एकर जमिनीचा होणार लिलाव

प्रतिनिधी

■ **नवी मुंबई**

नवी मुंबईमधून कर्नाळा बँक घोटाळ्याबाबत महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. कर्नाळा बँकेतील ठेवीदार आणि गॅरेंटर यांचे पैसे परत करण्यासाठी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार विवेक पाटील यांच्या मालमत्तांचा लिलाव करण्याचे आदेश ईडीच्या विशेष न्यायालयाने दिले आहेत. पनवेलची प्रसिध्द कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी आणि पोसरी येथील १०२ एकर जमिनीच्या लिलाव करण्यात येणार आहे. त्यामधून जमा होणाऱ्या रक्कमेतून गैरव्यवहारातील रक्कम वसूल केली जाणार आहे.

५०० कोटींच्या घोटळ्याप्रकरणी विवेक पाटील मागील चार वर्षांपासून

- **कर्नाळा बँकेतील ५०० कोटींच्या घोटाळ्यात ईडीची मोठी कारवाई**
- **माजी आमदार विवेक पाटील यांच्या जमिनी व स्पोर्ट्स अकॅडमीचा लिलाव होणार**
- **ठेवीदार, विमा कंपन्या व कर्मचाऱ्यांचे देणे फेडण्यासाठी लिलाव**

तळोजा कारागृहात आहेत. इडीच्या पीएमएलए न्यायालयात विवेक पाटील यांनी आपल्या ८७ मालमत्तांचे लिलाव करून त्याच्यातून पैसे उभे करण्याबाबत न्यायालयात कळवले आहे. पहिल्या टप्प्यात कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी आणि पोसरी येथील १०२ एकर जमीनीचा या करिता लिलाव केला जाणार आहे. यापैकी पोसरी येथील जमिनीच्या लिलावाची प्रक्रिया सर्वात आधी केली जाणार आहे.

विमा कंपनीचे ३८० कोटी, उर्वरित ठेवीदारांचे १७८ कोटी आणि बँकेचा ताळेबंद कर्मचाऱ्याची थकबाकी, इनकम टॅक्सच्या रक्कमा आदी देणे संपविण्यासाठी पीएमएए कायद्यानुसार पनवेलची कर्नाळा स्पोर्टस अकॅडमी आणि खालापूर तालुक्यातील पोसरी येथील 103 एकर जमिन लिलावात काढली जाणार आहे. यातून सर्वांचे पैसे माघारी दिले जाणार आहेत.

# आयटीआयमध्ये मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत 'कारगिल विजय दिवस' साजरा

प्रतिनिधी

■ **लोणावळा**

भारताचा गौरवशाली इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचावा यासाठी आम्ही महाराष्ट्रातील एक हजार शासकीय औद्योगिक संस्थांमध्ये कारगिल विजय दिनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे, असे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले. कारगिल विजय दिनाच्या निमित्ताने क्रांतिकारक लहुजी साळवे ITI, लोणावळा येथे आयोजित कार्यक्रमात मंत्री लोढा बोलत होते. यावेळी समाजसेविका मंजू लोढा उपस्थित होत्या.

या उपक्रमामार्फत देशभक्ती, शौर्य आणि कृतज्ञतेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा हा आमचा उद्देश आहे. अनेक परकीय आक्रमणे आपल्या



देशावर झाली पण त्याचा सामना करून आपण प्रगतीच्या वाटेवर पुढे जात आहोत. कारगिल विजय दिनाच्या माध्यमातून आपला गौरवशाली इतिहास सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही हा उपक्रम आयोजित केला आहे. आज विद्यार्थ्यांसह स्थानिक नागरिक सुद्धा येथे उपस्थित आहेत, याचा अतिशय आनंद आहे असे प्रसंगी बोलतांना मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

कार्यक्रमात मुलांसाठी विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते, जिथे त्यांना देशसेवा, शिस्त आणि समर्पण यांची शिकवण देण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष देशसेवकांशी संवाद साधत सैनिकांच्या अनुभवांची माहिती घेतली. यावेळी समाजसेविका मंजू लोढा यांनीही उपस्थित सैनिकांचे आभार मानत, आपल्या भावना व्यक्त केल्या.

# यंदा पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा !

## महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे श्री गणेशोत्सव नियोजन बैठकीप्रसंगी आवाहन

प्रतिनिधी

■ **नवी मुंबई**

सन 2025 या वर्षात श्रीगणेशोत्सव हा दि. 27 ऑगस्ट 2025 ते 06 सप्टेंबर 2025 आणि नवरात्रौत्सव हा दि. 22 सप्टेंबर 2025 ते दिनांक 02 ऑक्टोबर 2025 या कालावधीत संपन्न होणार आहे. त्या अनुषंगाने या उत्सवांचे सुव्यवस्थित आयोजन करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका, पोलीस विभाग, वाहतुक पोलीस विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व नवी मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव / नवरात्रौत्सव मंडळाचे पदधिकारी यांची विशेष बैठक महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात



संपन्न झाली. या बैठकीप्रसंगी उपस्थित 63 गणेशोत्सव/ नवरात्रौत्सव मंडळाचे पदाधिकारी, नवी मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी तसेच पोलीस विभाग, अग्निशमन विभाग, महाराष्ट्र राज्य प्रदूषण मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी सूचना केल्या. त्या सर्व सूचना लक्षात घेऊन त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी प्लास्टिक व थर्माकोलमुक्त पर्यावरणपूरक, पारंपारिक सजावट करण्याचे तसेच प्रतिष्ठापना करावयाच्या सार्वजनिक तसेच घरगुती श्रीगणेशमूर्तीही पर्यावरणपूरक असाव्यात असे उपस्थितीतांना आवाहन केले. श्रीगणेशोत्सव व नवरात्रौत्सव दरम्यान ध्वनीप्रदूषण होणार नाही व त्याचा नागरिकांना तसेच शाळेतील मुलांना त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असेही सूचित करण्यात आले.

या बैठकीस नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे, उपआयुक्त परिमंडळ-01 श्री.सोमनाथ पोटरे, उप आयुक्त परिमंडळ-02 संजय शिंदे, उपआयुक्त घनकचरा व्यवस्थापन डॉ.अजय गडदे व श्रीम. स्मिता काळे, समाजविकास उपायुक्त किसनराव पलांडे, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे तसेच सर्व विभाग अधिकारी, सर्व कार्यकारी अभियंता, उपमुख्य अग्निशमन अधिकारी, स्वच्छता विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

# ऊर्दू शाळेत मुख्यमंत्र्यांचा जन्मदिवस साजरा

प्रतिनिधी

■ **भाईंदर**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस निमित्ताने सामाजिक बांधिलकी म्हणून भाजपा कामगार मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष गजाननजी नागे" यांनी मोफत वह्या वाटपाचा व खाऊ वाटप कार्यक्रम मिरा भाईंदर महानगरपालिका उर्दू शाळा क्रं-३२ मिरागाव, काशीमीरा, मिरा रोड, ठाणे. येथे आयोजित केला होता.

शुद्ध विचाराने प्रेरित होऊन, हाच हेतू मनाशी बांधून समाजातील धार्मिक तेढ दूर व्हावी ही संकल्पना घेऊन, एक पुढचं पाऊल म्हणून गजानन नागे नी उचललं होतं



"हिंदूत्व" म्हणजेच 'सहिष्णुता' आणि 'सर्वधर्म समभाव' आचरणात आणून समाजामध्ये सर्व समावेशक वातावरण निर्माण व्हावं आणि एका चांगल्या वातावरणाची निर्मिती व्हावी. हा विचारच आपल्या धर्माचा गाभा तो धर्म नव्हे तर एक संस्कृती आहे.हिच आपल्या प्राचीन सनातन संस्कृतीच्या जीवनाची यशस्वी वाटचाल याच संस्कृतीची बीजं घेऊन, उर्दू शाळेतील मुस्लिम लहान मुलांच्या चेहऱ्यावरचा वह्या व खाऊ स्वीकारताना आनंद द्विगुणीत झालेला पाहिला होता. त्यांच्या चेहऱ्यावरचा ते हास्य आणि तो आनंद पाहून अक्षरशः तिथले शिक्षकवृंद आणि इतर सर्व उपस्थित मान्यवर नगरसेवक मोहन म्हात्रे, सुरेखा सोनार आणि सामाजिक कार्यकर्ते सलिम शाहा, मंदार पाटील व प्रदिप बिरमोळे,समाजसेवक यांच्या डोळ्याचे पारणे फिटेले होते. डोळे आनंद अश्रुंनी भरून आले होते.

लहान मुलांनी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांना शत आयुष्य, देशसेवेसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या मुलींनी हात उंचावून अल्ला कडे प्रार्थना केली. मुस्लिम समाजातील पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह्या कार्यक्रमासाठी विदर्भ वैभव मंदिर मुंबई या संस्थेने सहकार्य करुन सामाजिक बांधिलकी जपली.

## तरुण डॉक्टरची इंजेक्शन घेऊन आत्महत्या

**बीड**:बीडमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. बीडमध्ये तरुण डॉक्टरने इंजेक्शन घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. तरुण डॉक्टर हा खासगी रुग्णालयात आरएमओ म्हणून कार्यरत होता. तरुण डॉक्टरच्या मृत्यूने त्याच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. बीड शहरातील एका खासगी रुग्णालयात निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या डॉक्टरने इंजेक्शन घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. संजय ढवळे असे डॉक्टरचे नाव आहे. डॉक्टर ढवळे हा भूलतज्ञ म्हणून कार्यरत होता. त्याने औषधाचे इंजेक्शन घेऊन आत्महत्या केल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे.



**नाशिक -** पंजाब,लुधीयाना येथील सुप्रसिध्द लेखिका व कवयित्री, समीक्षक डॉ जसप्रीत कौर फलक यांच्या "कैनवास के पास" या १२ भाषांमध्ये अनुवाद केलेलया पुस्तकाचे राष्ट्रीय कवी आणि लेखक समीक्षक मराठी भाषा अनुवादक संजय मुकूंदराव निकम महाराष्ट्रातील मालेगाव , नाशिक येथील व्यक्तीने "कैनवास के पास" या पंजाबी, हिंदी कविता संग्रहाचा मराठी भाषा अनुवाद केला आहे. हे पुस्तक महाराष्ट्रात लवकरच वाचकांच्या भेटीला येणार आहे.

# दिवा कचराभुमीसाठी लावलेला दंड चुकीचा

## ठाणे महापालिकेने मागितली हरित लवादाकडे दाद



प्रतिनिधी

■ **ठाणे**

दिवा येथील कचराभुमीमुळे पर्यावरणाचे नुकसान झाल्याप्रकरणी राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठाणे महापालिकेला १० कोटी २० लाख रुपयांचा दंड भरण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, पालिकेला लावण्यात आलेला हा दंड चुकीचा असून त्याचे स्पष्टीकरण देण्यासाठी प्रशानसाने लवादाकडे दाग मागितली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध भागातील गृहसंकुले, आस्थापनांचा कचरा गोळा करून तो दिवा कचराभूमीत नेला जात होता. ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज १ हजार ५० टन कचरा निर्माण होतो. त्यापैकी १२५ टन कचऱ्यावर विविध प्रकल्पांतर्गत शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून त्यापासून खतनिर्मिती केली जाते. उर्वरित सुमारे ६०० टन ओला कचरा दिवा कचराभूमीवर टाकला जात होता. या कचराभूमीत आग लागण्याचे प्रकार घडत होते. या धुरासह दुर्गंधीमुळे नागरिक हैराण झाले होते.

कचराभूमीत कचऱ्याचे डोंगर तयार झाले होते. तसेच येथील रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्नही यामुळे उपस्थित झाला होता. अनेकदा कचऱ्याला आगी लागून वायु प्रदूषण निर्माण झाले होते. कचराभूमीलगतची जैवविविधता देखील यामुळे धोक्यात आली होती. कचराभूमी बंद व्हावी यासाठी अनेक आंदोलने झाली होती. परंतु महापालिकेकडून कचराभूमीवर कचरा टाकणे सुरूच होते. अखेर ठाणे महापालिकेने पाच वर्षांपूर्वी येथील कचराभूमी बंद केली. असे असले तरी तिथे यापुर्वी टाकलेला कचरा कायम आहे. दरम्यान, या कचराभूमीमुळे जैवविविधता धोक्यात आल्याने मुंबईस्थित वनशक्ती या संस्थेने २०२२ मध्ये हरित लवादाकडे दाद मागितली होती.

### पालिकेने मागितली दाद

*राष्ट्रीय हरीत लवादाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी दिलेल्या निर्णयात दिवा डम्पिंगमुळे झालेली पर्यावरणाची हानी ही गंभीर बाब असल्याचे म्हटले होते. त्यानुसार 'एमपीसीबी'ने २ जुलै २०२५ रोजी ठाणे पालिकेला पत्र पाठवले. त्यात १ मे २०२४ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीतील 'पर्यावरणीय भरपाई' म्हणून १० कोटी २० लाखांचा दंड ठोठावण्यात येत असल्याचे म्हटले आहे. परंतु पालिकेला लावण्यात आलेला दंड चुकीचा असल्याचे पालिकेचे म्हणणे आहे.*



## खांदेरी किल्ल्याजवळ बोट बुडाली

**बीड** : रायगड जिल्ह्यातून मोठी दुर्दैवी घटना समोर येत आहे. खांदेरी किल्ल्याजवळ बोट बुडाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. ही बोट आज सकाळी सात वाजेपासून समुद्रात मासेमारीसाठी गेली होती, अशी प्राथमिक माहिती आहे. बोटीत एकूण 8 जण होती. बोट समुद्रात असताना ओहटीच्या लाटांमुळे उलटल्याची घटना घडली. या घटनेनंतर 5 जण बचावले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तर 3 जणांचा शोध अद्याप सुरु आहे. प्रशासनाकडून युद्ध पातळीवर शोध मोहीम सुरु आहे. पण मुसळधार पावसामुळे शोध मोहीमेत अडथळा येत असल्याची देखील माहिती आहे.






# दापोली ते कांदिवली व्हाया नवी मुंबई

# सुडाच्या राजकारणाचा प्रवास

**पावसाळी अधिवेशन संपून दहा दिवस झालेत, पण जगबुडी नदीतील रेती उपसापासून कांदिवली च्या 'सावली' लेडीज बारपर्यंतची चर्चा अजूनही सुरूच आहे. किंबहुना सामाजिक कार्यकर्त्यां अंजली दमानियांमुळे या चर्चेने अधिक जोर धरला आणि रंगत आली. यामुळे गृहराज्यमंत्री योगेश कदम हे पुरते कोंडीत सापडले. दापोलीच्या साई रिसॉर्ट पासून सुरु झालेला हा सुडाचा प्रवास नवी मुंबई, कांदिवली करत विधानभवनात पोहचला आणि योगेश कदम यांच्या राजीनामाच्या मागणीचा जोर वाढू लागला. आधीच अर्जुन खोतकर, संजय शिरसाट, संजय गायकवाड यांच्यामुळे अडचणीत असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा एकदा योगेश कदम यांच्या प्रकरणाने अडचणीत सापडले. परिणामी फडणवीस सरकारबाबतही जनतेत नाराजी पसरू लागली. यातूनच मार्ग काढण्यासाठी किंबहुना फडणवीस सरकारची पत वाचविण्यासाठी वादग्रस्त मंत्र्यांकडून राजीनामा घेण्यापेक्षा मंत्रिमंडळात फेरबदल करून या वादग्रस्त आणि वाचाळ मंत्र्यांना डच्चू देण्याची शक्यता अधिक आहे. एकंदरीत शिंदे यांची राजकारणातील सध्याची स्थिती पाहता गुलजार यांची गझल आठवते...**

**इज्जत किसी इन्सानकी**
**नही होती,जरूरतकी होती है !**
**जरुरत खत्म ! इज्जत खत्म !!**
**यही दुनियाका सच है !**

दिसले ते लिहिले
सुरेंद्र मुळीक

'जेपेराल तेच उगवेल' हे पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा महाराष्ट्राला दिसून आले. यंदाच्या अधिवेशनात फडणवीस सरकारला घेरण्यापेक्षा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला कसे घेरता येईल हेच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने ठरविले आणि त्यात उद्धव ठाकरे यशस्वीही झाले. याला कारण भाजपाने योग्य त्या प्रमाणात दिलेली साथ असेच म्हणावे लागेल. यामुळेच एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांचे एकापाठोपाठ एक कारनामे बाहेर येऊ लागले.



आणि आपसूकच उपमुख्यमंत्री शिंदे अडचणीत सापडू लागले. पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीलाच खासदार संजय राऊत यांनी हादरा दिला. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा बेडरूम मधील एक व्हिडीओ संजय राऊत यांनी प्रसिद्ध केला. या व्हिडीओमध्ये पैशाने भरलेली भली मोठी बॅग दिसत असून या बॅगेच्या बाजूलाच असलेल्या बेड वर बसून मंत्री शिरसाट सिगारेट फुकतांना दिसत आहेत. 'मै जिंदगी का साथ निभाता चला'.. 'हर फिक्र को धुवे मे उडाता चला गया' असेच जणू काही ते एकनाथ शिंदे यांना सांगत असावे. या व्हिडीओमुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. तरीही माझ्या जवळ असलेल्या बॅगेत पैसेच नाहीत ते कपडे आहेत असे सांगून मंत्री संजय शिरसाट यांनी आपल्या बेफिकीरी स्वभावानुसार सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिलीत. पण सामाजिक कार्यकर्त्यां अंजली दमानिया यांनी या विषयाची जेव्हा दखल घेतली. तात्काळ शिरसाट यांनी मौन धारण केले. कदाचित एकनाथ शिंदे यांनी त्यांना सल्ला दिला असावा. आधीच आमदार अर्जुन खोतकर यांच्या जवळच्या व्यक्तीजवळ धुळे येथील शासकीय विश्रामगृहात सापडलेल्या कोट्यावधी रुपयांमुळे एकनाथ शिंदे अडचणीत आले होतेच. त्यात संजय शिरसाट यांच्या शेजारीच पैशानी भरलेल्या बॅगेच्या व्हिडीओ प्रसिद्ध झाल्याने एकनाथ शिंदे यांची चर्चा होणे स्वाभाविकच होते. आणि अशी आयती चालून आलेली संधी विरोधक कसे सोडणार! मंत्री संजय शिरसाट यांच्याजवळ असलेली बॅग म्हणजे 'पन्नास खोके,एकदम ओके' या योजनेतीलच आहे असा आरोप विरोधकांनी केला. संजय शिरसाट यांचे पैशाच्या बॅगेचे हे प्रकरण सुरु असतानाच शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवास उपहार गृहातील एका गरीब कामगाराला बॉक्सिंग स्टाईलने ठोका लगावत मारहाण केली. रात्रीचा शिळा भात दिल्याने आमदार संजय गायकवाड यांचा पारा चढला आणि त्यांनी त्या कामगाराला मारहाण केली असल्याचे स्पष्ट झाले. पण त्याच वेळी पावसाळी अधिवेशन सुरु असल्याने संजय गायकवाड यांनी कामगाराला केलेल्या मारहाणीचा मुद्दा सभागृहात उपस्थित झाला आणि मुख्यमंत्री फडणवीस यांनी अध्यक्षांनीच यात लक्ष घालावे असे सांगितले. यां साऱ्या प्रकरणातून एकनाथ शिंदे कुठे उसंत घेत असतानाच विधानपरिषदेत उद्धव ठाकरे शिवसेनेचे आमदार ॲड. अनिल परब यांनी खेड मधील जगबुडी आणि आसपासच्या





नद्यातील रेती उपसावर सभागृहाचे लक्ष वेधले. रेती उपसाची परवानगी एकाच व्यक्तीला का देण्यात आली यात एका राज्यमंत्र्याचा सहभाग आहे असाही आरोप अनिल परब यांनी केला. त्यांचवेळी स्पष्ट झाले की योगेश कदम हे अडचणीत येणार. पण रेती उपसा हा पर्यावरणाच्या दृष्टीने तसा गंभीर विषय असला तरी चांदा पासून बांदा पर्यंत असलेल्या नद्यातील बेकायदेशीर रेती उपसा बिनबोभाटपणे सुरूच असतो. यात वरपासून खालपर्यंत साऱ्यांचाच सहभाग असतो. रॉयल्टी च्या माध्यमातून जी काही रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा होते त्याच्या पन्नास पटीने रेतीचा उपसा केला जात असतो हे काही नवीन नाही. त्यामुळे रेती उपसा च्या प्रकरणातून गृहाराज्यमंत्री योगेश कदम यांना अडचणीत आणणे तितकेसे शक्य झाले नसते. म्हणूनच अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीच 'सावली' बार वर पोलीसानी घातलेल्या धाडीचे प्रकरण सभागृहात आणले गेले आणि अनिल परब यांनी अत्यंत प्रकर्षाने हे प्रकरण मांडले. अनुभवी असलेले अनिल परब यांनी हे प्रकरण इतक्या ताकतीने मांडले की संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. कारण ज्या बार मध्ये पोलिसांनी धाड घालून 22 बार बालाना



अटक केली तो 'सावली' बार गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या मातोश्री च्या नावावर आहे. यामुळे योगेश कदम आपसूकच अडचणीत आले. अनिल परब यांनी केलेल्या आरोपावर उत्तर देताना योगेश कदम यांचा अनुभव कमी पडला. त्यामुळे योग्य असे उत्तर देणे त्यांना जमलेच नाही. माझ्या आईची बदनामी केली. मी अनिल परब यांच्या विरोधात हक्कभंग दाखल करणार इतकेच ते बोलू शकले. तसे पाहिले तर हे काही अचानक घडले नाही तर यामागे मागील दहा वर्षातील सुडाचा राजकारणाचा आणि भावकीचा वादाचा प्रवास आहे. आणि सत्ताधारी पक्षाची साथ आहे असे म्हटल्यास चूकीचे ठरणार नाही.



साई रिसॉर्ट, दापोली




## 48 तासात सारे घडले

वडिलांचा फायदा राजकारणात, व्यवसायात ज्याप्रमाणे मुलाला मिळत असतो त्यांचप्रमाणे वडिलांचा असलेला वाद मुलाला भोगावेही लागतात. गृहराज्य मंत्री योगेश कदम यांच्याबाबतीत नेमके हेच झाले आहे आणि होत आहे. रामदास कदम यांचा राजकारणात अनेकांशी वाद आहेच पण सख्खा भाऊ सदानंद कदम यांच्याशीही टोकाचा वाद आहे. सख्खे भाऊ असूनही दोघांमध्ये विस्तवही जात नाही हे खेड दापोलीत सर्वांनाच माहित आहे. त्यात सदानंद कदम हे शिवसेना नेते ॲड.अनिल परब यांचे निकटवर्तीय. याच ताकतीवर सदानंद कदम यांनी खेड, दापोली परिसरात व्यवसायाच्या माध्यमातून हळूहळू दबदबा निर्माण केला. खेड आणि दापोलीत सदानंद कदम आणि अनिल परब यांचा वाढत चाललेला दबदबा पाहता आपल्या साम्राज्याला धक्का लागतो की काय अशी भीती म्हणा किंवा शंका म्हणा रामदास कदम यांच्या मनात निर्माण झाली आणि ती होणे स्वाभाविक आहे. तिथूनच सुरु झाला राजकीय सुडाचा प्रवास. यां प्रवासातील पहिला धक्का बसला तो सदानंद कदम व अनिल परब यांना. दापोली मुरुड येथील 'साई रिसॉर्ट' अनधिकृत ठरवून त्याचा वरील भाग पाडण्यात आला आणि साई रिसॉर्ट बंद करण्यात आले. हे रिसॉर्ट उद्धव ठाकरे यांच्या जवळचे अनिल परब असल्याने हे रिसॉर्ट अनिल परब यांचेच आहे असा धिंडोरा पेटवून उद्धव ठाकरे यांना बदनाम करण्याचाही त्यावेळी प्रयत्न केला. यासाठी किरीट सोमय्या यांचाही वापर करण्यात आला. हळूहळू हे सारे प्रकरण शांत झाले. परंतु आतमध्ये ते धुमसतच होते. त्यानंतर शिवसेनेत फूट पडताच योगेश कदम एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेले. तत्पूर्वी रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे आणि मातोश्री बाबत व्यक्तिगत स्तरावर जाऊन टीका केली. यामागचे महत्वाचे कारण म्हणजे महाविकास आघाडी सरकारमध्ये रामदास कदम यांना मंत्रिपद न मिळणे हे होते. यामुळे काहीसे अस्वस्थ झालेल्या रामदास कदम यांनी शिवसेना फुटताच आपला मुलगा आमदार योगेश यांना शिंदे सोबत पाठविले. शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांच्या विरोधात रामदास कदम यांनी सडकून टीका करण्यास सुरुवात केली. याबद्दल रामदास कदम यांना बक्षीसी म्हणून योगेश कदम यांना गृहराज्यमंत्री पद तर दुसरा मुलगा सिद्धेश कदम यांना महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाचे अध्यक्ष पद एकनाथ शिंदे यांच्याकडून देण्यात आले. यामुळे रामदास कदम यांचा पुन्हा एकदा खेड आणि दापोलीत वर्चस्व निर्माण होऊ लागले. याच वर्चस्वामुळे योगेश कदम यांच्या विरोधात उभे राहिलेले संजय कदम यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. यां साऱ्या घडामोडी पाहता योगेश कदम कधी अडचणीत येतात याची उद्धव ठाकरे यांची शिवसेना वाट पाहताच होती. आणि शिवसेनेला ही संधी चालून आली. विशेष म्हणजे ही संधी गृहराज्य मंत्री योगेश कदम यांच्या जवळच्याच सहकाऱ्यांनी दिली असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. असे म्हटले जाते की 28 मे रोजी गृहराज्य मंत्री योगेश कदम यांच्या सहकारी मंडळींनी नवी मुंबईतील एका बारवर धाड घातली. सर्वसाधारणपणे कोणतीही धाड ही पोलीस घालतात. परंतु ही जेव्हा धाड घातली गेली त्याबाबत तेथील पोलीस ठाण्याला काहीच कळविले नाही किंवा त्यांना त्याची कल्पनाही दिली नाही. यामुळे हे सारे प्रकरण गृहमंत्री असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहचले. त्यांनी यां धाडी संदर्भात सविस्तर माहिती मागून घेतली. नवी मुंबई तुर्भे मार्गांवर असलेल्या यां बार मध्ये गृहराज्य मंत्र्यांच्या जवळच्यानी धाड का घातली यामागील उद्देश जाणून घेतला असावा. त्यानंतर अवघ्या 48 तासात 30 मे रोजी कांदिवली येथील 'सावली' बार वर पोलिसांनी धाड घातली. ही धाड रात्री 10 ते 11 च्या दरम्यान घातली गेली. विशेष म्हणजे ही धाड क्राईम ब्रँच विभागाने टाकली. तीही अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने. व्हिडीओ तयार करून धाड घातली. बार पासून केवळ 75 मिटरवर असलेल्या समता नगर पोलिसांनाही याबाबत कळविण्यात आले नसावे. यां धाडीत एकूण 32 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. यात 22 बारबाला आहेत. गृहाराज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावे म्हणजेच रामदास कदम यांच्या पत्नीच्या नावे हा बार आहे. हा बार शेट्टी नावाच्या इसमाला चालवायला दिला होता असे रामदास कदम यांचे म्हणणं असून आता हा बार बंद केला असेही त्यांनी स्पष्ट केले. दुसऱ्या दिवशी अटक झालेल्या सर्वांना जामीन झाला आणि सारे प्रकरण शांत झाले. बारवर पोलिसांच्या धाडी पडणे हे मुंबई आणि महाराष्ट्रात काही नवीन नाही त्या पडतच असतात. मग कांदिवली च्या 'सावली' बार मागील धाडीत असे काय लपले होते. की तब्बल दोन महिन्यांनी यां धाडीचे प्रकरण थेट विधिमंडळात पोहचले आणि योगेश कदम यांच्या राजीनामा घेण्याची मागणी जोर धरू लागली. याचे कारण काय असा प्रश्न सर्वांसमोर निर्माण होणे साहजिकच आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे नवी मुंबईतील बारवर गृहराज्य मंत्री यांच्या जवळच्यानी घातलेली धाड असेच म्हणावे लागेल. या धाडीचा उद्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळला असावाच असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. असे म्हटले जाते की जे काचेच्या घरात राहतात त्यांनी दुसऱ्यावर दगड मारू नये. पण गृहाराज्यमंत्री योगेश कदम यांनी किंवा त्यांच्या निकटवर्तीयांनी ही चूक केली. परिणामी योगेश कदम नाहक अडचणीत आले.त्यामुळे दापोली मुरुड येथील रिसॉर्ट तोडल्या नंतर सुरु झालेला झालेला राजकीय सुडाचा प्रवास अनिल परब यांनी विधानपरिषदेत पूर्ण केला अशीच खेड दापोलीतच नाही तर महाराष्ट्रात चर्चा आहे. मुळात आपण गृहराज्यमंत्री आहोत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गृहमंत्री आहेत असे असताना कोणत्याही बार वर धाड घालण्यापूर्वी योगेश कदम यांनी फडणवीस यांची परवानगी न घेणे ही चूकच मानायला हवी. कदाचित आपले गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत याचा विसर योगेश कदम यांना झाला असावा. योगेश कदम यांच्या याच चूकीमुळे केवळ त्यांच्या आईच्या नावावर असलेला सावली बार बंद करण्याची नामुष्की ओढवली नाही. तर त्यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याच्या मागणीने जोर धरला आहे. विशेष म्हणजे सामाजिक कार्यकर्त्यां अंजली दमानिया यांनी सावली बार ची पाहणी करून समता नगर पोलिसांची भेट घेतली आणि सर्वच माहिती घेतली. इथेच दमानिया थांबल्या नाहीत तर त्या म्हणाल्या की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योगेश कदम यांचा राजीनामा घेतला नाही तर मी न्यायालयात जाईन. यामुळे योगेश कदम यांच्या अडचणीत नक्कीच वाढ झालेली दिसत आहे. यातून कदम यांना एकनाथ शिंदे कसे बाहेर काढतील हे पाहणे गरजेचे आहे.

## शिंदेही अडचणीत आहेत

फडणवीस यांचे सरकार आल्यापासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या ना त्या कारणाने सातत्याने अडचणीत सापडत आहेत. मुख्यमंत्री न मिळाल्याने नाराज झालेले एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दरबारी अनेक फेऱ्या मारल्या पण दिल्लीश्वरांनी शिंदे यांची फारसी दखल न घेतल्याने शिंदे सातत्याने नाराज दिसत आहेत. त्यांची ही नाराजी जनतेपासून लपून राहिलेली नाही. त्यातच फडणवीस यांनी शिंदे यांच्या एकापाठोपाठ एक मंत्र्यांना चाप लावत गेल्याने शिंदे यांच्या शिवसेनेतील सारेच मंत्री नाराज आहेत. इतकेच नाही तर फडणवीस यांनी शिंदे यांच्या नगरविकास विभागालाही चाप लावण्याचे ठरविले असल्याने शिंदे यांच्या शिवसेनेतील राजकारण ढवळून निघाले आहेत. शिंदे यांचे राजकारणतील वजन कमी करणे हाच त्यामागील उद्देश आहे. चाप लावण्याच्या या प्रकारामुळे येणाऱ्या पालिका निवडणुकीत शिंदे यांची शिवसेनेला मर्यादा येण्याचीही शक्यता राजकीय वर्तुळात चर्चा आहे. यामुळे 'इथे आड, तिथे विहीर' अशाच विचित्र अवस्थेत शिंदे यांची शिवसेना सापडलेली आहे. राजकारणात कोणीही कायमचा शत्रू नसतो आणि कोणीही कायमचा मित्र नसतो हे तंत्र एकनाथ शिंदे आणि त्यांचे सहकारी सोयीस्कररित्या विसरले त्यामुळेच हे सारे घडले आणि घडत आहेत. शिवसेनेतून बाहेर पडल्यावर शिंदे आणि त्यांच्या सहकारी आमदारांनी उद्धव ठाकरे वर नाहक आगपाखड केली. तिथेच शिंदे आणि त्यांचे सहकारी चूकले असे म्हणावे लागेल. भाजपा पुन्हा मुख्यमंत्रीपद देतील असा शिंदे यांचा समज होता नव्हे विश्वास होता तो फोल ठरला. सध्या दिल्लीचे राजकारण पाहता उद्धव ठाकरे यांच्याशी भाजपाने जुळवून घेतले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. अंबादास दानवे यांच्या निवृत्तीच्या दिवशी झालेल्या फोटोसेशन वेळी घडलेल्या गोष्टी सारे काही सांगून जात आहे. शिवसेना एकनाथ शिंदे यांचीच आहे असा निर्णय देणारं विधानसभा चे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी चक्क उद्धव ठाकरे यांच्या पायाला हात लावून नमस्कार केला आणि तेही देवेंद्र फडणवीस यांच्या समोर. हे सारे पाहत महाराष्ट्राचे राजकारण वेगाने वळण घेणार यात शंका नाही. कारण एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांच्या मनमानी वागणुकीला फडणवीस सरकार कंटाळले आहेत. किंबहुना एकनाथ शिंदेही कंटाळले असतील असे म्हटल्यास चूकीचे ठरणार नाही. पण जे आमदार आणि मंत्री उद्धव ठाकरे यांना ऐकत नव्हते उद्धव ठाकरे यांना मानत नव्हते ते एकनाथ शिंदे यांचे कसे ऐकणार हाही प्रश्न आहे. म्हणूनच अशा मंत्र्यांकडून राजीनामा मागणेही शिंदे यांना कठीण होणारच पण आपल्याच मंत्राचे राजीनामा घेतले तर फडणवीस सरकारची नामुष्की होईल. तर दुसरीकडे शिंदे यांची पत घसरू शकेल. म्हणूनच यावर तोडगा म्हणजे मंत्रिमंडळात फेरबदल केला जाण्याची जास्त शक्यता आहे. त्यामुळे बेतालपणे बोलणाऱ्या आणि वागणाऱ्या मंत्र्यांना डच्चू देणे सोयीचे होईल आणि सरकारची इभ्रत वाचवीता येईल. मागील सहा महिन्यात राज्यात घडत असलेल्या राजकीय घडामोडी पाहता आम्हाला फारशी कोणाची गरज नाही असे फडणवीस यांनी सूचित केले आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. यामुळे शिंदे यांच्या शिवसेनेला सध्या तोंड दाबून बुक्याचा मार खावा लागत आहे. सुप्रसिद्ध गझलकार गुलजार यांच्या भाषेत सांगायचे झाल्यास....

इज्जत किसी इन्सानकी
नही होती,जरूरतकी होती है !
जरुरत खत्म ! इज्जत खत्म !!
यही दुनियाका सच है !

दुनियाका सच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वीकारतील का! ही येणारी वेळच ठरविणार.

## जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत समता विद्या मंदिर शाळेच्या दोन खेळाडूंची निवड

**मुंबई :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर यांच्या वतीने 12 वर्षाखालील मुले व मुलीं करिता मुंबई उपनगर शालेय क्रीडा स्पर्धा 2025 - 26 चे आयोजन करण्यात आले आहे. त्याकरिता जिल्हास्तरीय खेलो इंडिया निवड चाचणीत कबड्डी या खेळाकरिता साकीनाका येथील समता विद्या मंदिर शाळेच्या शुभम मनोज यादव व आशिष दिलबर सिंग पनवार या दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्याबद्दल या दोन्हीही खेळाडूंना शाळेचे सचिव राजेश सुभेदार व क्रीडा शिक्षकांकडून शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत.



## स्टोक्सचं 2 वर्षांनंतर कसोटीत शतक

### विक्रमी कामगिरी करणारा इंग्लंडचा पहिला कर्णधार



**वृत्तसंस्था**
■ **मँचेस्टर**

कर्णधार बेन स्टोक्सने भारताविरूद्ध चौथ्या कसोटीत कमालीची फलंदाजी करत तब्बल २ वर्षांनी कसोटीमध्ये शतक झळकावलं आहे. अष्टपैलू खेळाडू असलेल्या बेन स्टोक्सने मँचेस्टर कसोटीत ५ विकेट्स घेतरले आणि त्यानंतर आता त्याने शतकी कामगिरी केली आहे. यासह स्टोक्सने अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे.

बेन स्टोक्स इंग्लंडकडून पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरला. त्याने जो रूटबरोबर संघाचा डाव सावरत शतकी भागीदारी रचली. पण तिसऱ्या दिवशी खेळत असताना स्टोक्सला सातत्याने पायात क्रॅम्प येत होते. ज्यामुळे त्याला चालताना प्रचंड त्रास होत होता. पण तरीही स्टोक्सने मैदानावर राहत कमालीचे फटके खेळत आणि प्रसंगी संयमाने फलंदाजी करत संघाचा डाव पुढे नेला. बेन स्टोक्सचं हे विक्रमी शतक ठरलं. ४२ वर्षांनी कसोटी क्रिकेटमधील एकाच सामन्यात कोणत्या कर्णधाराने पाच विकेट्स आणि शतक केलं आहे. याआधी १९८३ मध्ये इमरान खानने हा कारनामा केला होता. याशिवाय बेन स्टोक्स हा एकाच सामन्यात शतक आणि पाच विकेट्स घेणारा पहिलाच इंग्लंडचा कर्णधार आहे.

**एका कसोटीत शतक आणि ५ विकेट घेणारे कर्णधार**

डेनिस एटकिन्सन (वेस्ट इंडिज) वि. ऑस्ट्रेलिया, ब्रिजटाऊन, १९५५
गॅरी सोबर्स (वेस्ट इंडिज) वि. इंग्लंड, लीड्स, १९६६
मुश्ताक मोहम्मद (पाकिस्तान) वि. वेस्ट इंडिज, पोर्ट ऑफ स्पेन, १९७७
इमरान खान (पाकिस्तान) वि. भारत, फैसलाबाद, १९८३
बेन स्टोक्स (इंग्लंड) वि. भारत, मँचेस्टर, २०२५

## भारताच्या लेकी 'लय पॉवरबाज...'

## फिडे विश्वचषक फायनलमध्ये दिव्याने कोनेरूला रोखले बरोबरीत

### पहिल्या गेममधे दोघींमध्ये तुल्यबळ लढत



**वृत्तसंस्था**
■ **बटुमी**

जागतिक बुद्धिबळात चिनी खेळाडूंचे वर्चस्व मोडीत काढणारी मराठमोळी दिव्या देशमुख आणि भारताचा तिरंगा अनेक आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धांत मानाने फडकावणारी ग्रँडमास्टर कोनेरू हंपी आज फिडेच्या जागतिक बुद्धिबळातील 'क्वीन' किताबासाठी जॉर्जियातील बटुमी शहरात आमने-सामने आल्या.दोघीही भारताच्या लेकी.त्यामुळे कुणीही जिंकले तरी जगज्जेतेपदाची माळ भारताच्याच गळ्यात पडणार हे कालच निश्चित झाले.आजच्या अंतिम फेरीच्या पहिल्या डावात दिव्या आणि कोनेरू यांची तुल्यबळ लढत पाहायला मिळाली. ४१व्या चालीअखेर दिव्या आणि हम्पीने बरोबरी मान्य केली.त्यामुळे या लढतीचा निकाल आता उद्या रवीवारवर गेला आहे.

दिव्या देशमुख सुरुवातीला सरस ठरणार असे संकेत होते. पण जिगरबाज हम्पी कोनेरूने हुशारीने पुनरावृत्ती करून बरोबरी साधली, ज्यामुळे दोन्ही खेळाडूंना प्रत्येकी अर्धा गुण मिळाला. दोघींनीही एकमेकींना विजयासाठी एकही संधी दिली नाही, ही एक संतुलित लढत होती. पहिला क्लासिकल गेम अनिर्णित राहिल्याने, सर्वांचे लक्ष आता उद्याच्या सामन्याकडे लागले आहे. दुसऱ्या क्लासिकल गेममध्ये हम्पीकडे पांढऱ्या तुकड्या असतील, ज्यामुळे विश्वचषक उपांत्य फेरी सुरू असताना तिला थोडासा फायदा होईल.

गुरुवारी कोनेरू हम्पीने उपांत्य फेरीत टायब्रेकर सामन्यात चीनच्या टिंगजी लेईचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. या सामन्यात १५ मिनिटांचे दोन गेम अतिरिक्त वेळेसह खेळवले जातात. त्यानंतर पुढील दोन टायब्रेकर गेम हे प्रत्येकी १० मिनिटांचे लेईने पहिला गेम जिंकून आघाडी घेतली. पण अशा अवघड परिस्थितीतही हम्पीने दुसरा गेम जिंकला आणि पुन्हा सामना बरोबरीत आणला. या टायब्रेक सामन्याच्या तिसऱ्या सेटमध्ये हम्पीने पहिल्या गेममध्ये पांढऱ्या तुकड्यांसह सुरुवात केली. खेळाच्या सर्व विभागांमध्ये लेईला हरवून विजय मिळवला. पहिला गेम जिंकल्यानंतर म्पीला अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी फक्त एक बरोबरी हवी होती आणि तिने ती जिंकून जेतेपदाच्या सामन्यात स्थान मिळवले.

भारतीय महिला बुद्धिबळपटू कोनेरू हम्पी आणि नागपूरची दिव्या देशमुख या दोघीही पुढील वर्षी होणाऱ्या महिला कँडिडेट्स टूर्नामेंटसाठी पात्र ठरल्या आहेत. दरम्यान, या दोघींमध्ये होणारी लढत ही ऐतिहासिक असणार आहे. त्यांच्यामध्ये २६ जुलैला अंतिम सामना सुरु होणार आहे. यामध्ये पहिला डाव 26 जुलैला झाला असून उद्या २७ जुलै रोजी दुसरा डाव असणार आहे. तर टायब्रेकर झाल्यास तो २८ जुलै रोजी खेळवण्यात येईल. या स्पर्धेत विजेत्याला ५० हजार डॉलर म्हणजेच अंदाजे ४१ .६ लाख रुपये मिळणार आहेत. तर उपविजेत्याला ३५ हजार डॉलर म्हणजेच अंदाजे २९ .१ लाख रुपये दिले जाणार आहेत.

## आशिया कप क्रिकेट स्पर्धा यूएईमध्ये खेळवली जाणार

### 9 ते 28 सप्टेंबर दरम्यान होणार टुर्नामेंट
### वेळापत्रक लवकरच होणार जाहीर




**वृत्तसंस्था**
■ **दुबई**

आशिया कप २०२५ क्रिकेट चषक युएईमध्ये खेळला जाणार आहे. ही स्पर्धा ९ सप्टेंबर रोजी सुरू होईल आणि अंतिम सामना २८ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल. आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी ही माहिती दिली आहे.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (पीसीबी) अध्यक्ष असलेले नक्वी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले आहे की, मला हे कळवताना आनंद होत आहे की एसीसी आशिया कप २०२५ आता अधिकृतपणे ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान यूएईमध्ये खेळला जाईल. ही एक उत्तम स्पर्धा असेल आणि आपल्या सर्वांना उत्तम क्रिकेट पाहायला मिळेल. वेळापत्रकाची संपूर्ण माहिती लवकरच शेअर केली जाईल.

भारताला २०२५ च्या आशिया कपचे यजमानपद मिळाले आहे, परंतु भारत आणि पाकिस्तानमधील वाईट संबंधांमुळे तो तटस्थ ठिकाणी खेळवला जाईल. ही स्पर्धा टी-२० स्वरूपात असेल.२०२३ चा आशिया कप पाकिस्तानने आयोजित केला होता. तथापि, सुरक्षेच्या कारणास्तव भारताने पाकिस्तानचा दौरा करण्यास नकार दिल्यानंतर तो हायब्रिड मॉडेलमध्ये खेळवण्यात आला. भारताचे सर्व सामने श्रीलंकेत झाले.

**पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव**

एप्रिलमध्ये पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, भारताने ६-७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर राबवले. पहलगाम हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. दोन्ही देशांमधील राजकीय संबंध वाईट आहेत. अशा परिस्थितीत, पाकिस्तान आशिया कप खेळण्यासाठी भारतात आला नाही. म्हणून, एसीसी यूएईमध्ये स्पर्धा आयोजित करत आहे.

**भारताने ८ वेळा आशिया कप जिंकला आहे.**

आशिया कपची सुरुवात १९८४ मध्ये झाली. ही स्पर्धा आतापर्यंत १६ वेळा खेळली गेली आहे. भारताने सर्वाधिक म्हणजे ८ वेळा जिंकली आहे. श्रीलंकेने ६ वेळा आणि पाकिस्तानने २ वेळा ही स्पर्धा जिंकली आहे.

## रिपब्लिकन पक्षाच्या अल्पसंख्यांक आघाडी अध्यक्षपदी सोहेल शेख

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

रिपब्लिकन पक्षाच्या अल्पसंख्यांक आघाडीच्या मुंबई प्रदेश अध्यक्ष पदी सोहेल शेख यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. अल्पसंख्याक आघाडीच्या मुंबई प्रदेश अध्यक्षपदी निवड होताच सोहेल शेख यांनी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांची भेट घेऊन आर्शिवाद घेतले.



रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेश अल्पसंख्यांक आघाडीचे नवनियुक्त अध्यक्ष सोहेल शेख हे जोगेश्वरीतील रिपब्लिकन पक्षाचे तरुण क्रियाशील कार्यकर्ते आहेत. दलित मुस्लिम एकता परिषदेतुन सोहेल शेख यांनी जोगेश्वरीत चांगले शक्तीप्रदर्शन घडवले आहे. रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातुन ते मुंबईत चांगले सामजिक कार्य करित आहेत.रिपब्लिकन पक्षात एकनिष्ठ राहुन केलेल्या चांगल्या कामामुळे सोहेल शेख यांच्यावर रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेश अल्पसंख्याक आघाडीच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी अधिकृतरित्या सोपवण्यात आल्याची घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे.

## मेसी आणि अल्बा यांच्यावर एका सामन्याची बंदी

■ **मियामी**

इंटर मियामीचे स्टार खेळाडू लिओनेल मेसी आणि जॉर्डी अल्बा यांना मेजर लीग सॉकर (एमएलएस) ने प्रत्येकी एका सामन्यासाठी बंदी घातली आहे.या वर्षीच्या एमएलएस ऑल-स्टार गेममध्ये दोन्ही खेळाडू सहभागी नसल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. परिणामी, दोन्ही खेळाडू इंटर मियामीच्या एफसी सिनसिनाटी विरुद्धच्या पुढील लीग सामन्यात खेळू शकणार नाहीत. इंटर मियामीचे मालक जॉर्ज मास यांनी या निर्णयाचे वर्णन “कठोर” आणि अन्याय्य असल्याचे म्हटले आहे. एमएलएस स्टेटमेंट एमएलएसने शुक्रवारी एक निवेदन जारी केले की, लीगच्या नियमांनुसार, पूर्व परवानगीशिवाय ऑल-स्टार गेममध्ये भाग न घेणारा कोणताही खेळाडू त्याच्या क्लबच्या पुढील स्पर्धेत खेळण्यास अपात्र मानला जातो.



एमएलएस ऑल-स्टार गेम म्हणजे काय? मेसी आणि अल्बा यांची निवड चाहत्यांनी ऑल-स्टार गेमसाठी केली होती, ज्यामध्ये एमएलएस संघ मेक्सिकन लीगा एमएक्स संघाशी सामना करत होता. अल्बा जुन्या दुखापतीमुळे त्रस्त असताना मेसीने व्यस्त वेळापत्रकामुळे विश्रांती घेण्याचा निर्णय घेतला. यामुळे इंटर मियामीने या सामन्यात दोन्ही खेळाडूंना मैदानात उतरवण्याचा निर्णय घेतला. एमएलएस ऑल-स्टार संघाने हा सामना ३-१ असा जिंकला. गेल्या वर्षीही मेसी दुखापतीमुळे ऑल-स्टार गेममध्ये सहभागी झाला नव्हता.

## 'म्हाडा'च्या अधिकृत संकेतस्थळावर 15 कोटी अधिकृत दस्तऐवज नागरिकांसाठी उपलब्ध

### 'म्हाडा'चे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या निर्देशानुसार पारदर्शक कारभाराच्या दिशेने धाडसी पाऊल

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) अखत्यारीतील सर्व प्रादेशिक मंडळांची कार्यालयीन दस्तऐवज बघण्याची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी यासाठी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत माहितीच्या स्वयंप्रकटीकरणाद्वारे (Proactive Disclousure under RTI Act) म्हाडाच्या https://mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर म्हाडातील संबंधित सर्व विभागांचा वर्गवारीनुसार १५ कोटी दस्तऐवज (संवेदनशील वगळून) नागरिकांना केवळ पाहण्यासाठी ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आला आहे, अशी माहिती 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांनी दिली.

नागरिक केंद्रस्थानी ठेवून 'म्हाडा' या निमशासकीय संस्थेने सुलभ व सुरक्षितरित्या माहिती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने याद्वारे ऐतिहासिक व धाडसी पाऊल टाकले आहे. या माध्यमातून म्हाडा कार्यालयीन प्रक्रियेतील पारदर्शकता वाढणार असून नागरिकांचा कार्यालयात येण्या-जाण्याचा त्रास कमी होणार आहे. सोडतीदरम्यान नागरिकांद्वारे घेतली जाणारी कागदपत्रे, माहिती आदीबाबत गुप्तता बाळगण्यात आली असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेप होणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली असल्याचे जयस्वाल यांनी सांगितले.

म्हाडा एक लोकाभिमुख कार्यालय असल्याने नागरिकांप्रती म्हाडाचे उत्तरदायित्व अधिक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार नागरिकांचे जीवनमान सुकर होण्याच्या दृष्टीने या निर्णयाची अंमलबाजवणी करण्यात आली आहे . या पार्श्वभूमीवर म्हाडा' चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी म्हाडा संबंधित १५ कोटी कागदपत्रे संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील, असे जाहीर केले होते. या आश्वासनाची पूर्तता करीत संबंधित अधिकाऱ्यांनी तत्परतेने कार्यवाही करीत १५ कोटी कागदपत्रे 'म्हाडा'च्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहेत. याअंतर्गत म्हाडाच्या विविध विभागांतील सूचना, निविदा, कार्यालयीन आदेश, कार्यालयीन टिप्पणी, प्रस्ताव मंजुरी यासारख्या दस्तऐवजाचा समावेश असून नागरिकांना सदर दस्तऐवज म्हाडा संकेतस्थळावर सहज एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारांतर्गत अर्ज करण्याची आवश्यकता देखील कमी होणार आहे. संकेतस्थळावरील माहिती ई प्रमाण वापरुन प्रमाणित करण्यात आली असून सत्यापित व सुरक्षित आहे. भविष्यातील संदर्भासाठी वापरकर्त्यांचे लॉग्सबाबतची माहिती या प्रणालीमध्ये जतन होणार आहे.

सदर सेवा वापरण्यासाठी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांसाठी (Citizen Corner) या विभागातील विभागनिहाय अभिलेख ( Department Wise Records) मध्ये जाऊन अर्जदाराने स्वत:ची नाव नोंदणी व लॉगिन करण्यासाठी आवश्यक माहिती ज्यामध्ये भ्रमणध्वनी क्रमांक, नाव, लिंग, जन्म दिनांक, यूजर नेम, पासवर्ड, अटी व शर्ती मंजूर करून लॉगिन, पासवर्ड नोंदवायचा आहे. अर्जदाराने आधार किंवा पॅन कार्ड नंबर टाकल्यानंतर केवायसी ओटीपी पडताळणी पूर्ण होणार आहे . यानंतरच संकेतस्थळावरील म्हाडाच्या विविध विभागांशी संबंधित दस्तऐवज नागरिकांना बघण्यासाठी उपलब्ध होणार आहे. मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणताही दस्तऐवज डाऊनलोड करता येणार नाही अथवा त्यांचे स्क्रीनशॉट घेता येणार नाहीत.

दस्तऐवज पाहताना नागरिकांना कारण नमूद करणे बंधनकारक असणार आहे. तसेच नागरिकांच्या संकेतस्थळावरील माहितीच्या सुरक्षिततेसाठी SSL सायबर सिक्युर लेअर आणि सेक्युरिटी ऑडिटचा अवलंब करण्यात आला आहे. जेणेकरून कोणीही कोणत्याही व्यक्तीची खासगी माहिती मिळवू शकणार नाही. म्हाडाचे संकेतस्थळ माहिती शोधण्यास अधिक सोपे, सुटसुटीत व अद्ययावत करण्यात आले असून लोकसेवा हक्क अधिनियमाअंतर्गत सेवा अधिसूचित करून ऑनलाईन प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे आणि म्हाडाच्या कामकाजात पारदर्शकता राखणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

## पालिकेकडून मूर्तिकारांना 910 टन शाडू मातीचे मोफत वाटप

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

न्यायालय, केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार, पर्यावरणपूरक श्रीगणेशोत्सव साजरा करण्यासाठी मुंबई महापालिकेने गेल्या काही वर्षांपासून जोर दिला आहे. मुंबईत पीओपी निर्मित गणेशमूर्तीपेक्षा शाडू मातीच्या मूर्ती घडविण्याकरिता प्रोत्साहन मिळावे, जास्तीत जास्त पर्यावरणपूरक मूर्ती घडविणाऱ्या मूर्तिकारांना दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत शाडू माती पुरविण्यात आली आहे. प्रत्येक परिमंडळात १०० टनासोबत आवश्यक तेवढी शाडू माती मूर्तिकारांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे. गतवर्षी २०० पेक्षा अधिक मूर्तिकारांना ५०० टन इतकी शाडू माती मोफत देण्यात आली होती. तर यावर्षी आतापर्यंत एकूण ९१० टन इतक्या शाडू मातीचे (जवळजवळ दुप्पट) मोफत वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदा शाडू मातीच्या श्रीगणेश मूर्तींच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

पर्यावरणपूरक गणेशमूर्ती घडविणाऱ्या एकूण ९९३ मूर्तिकारांना मूर्ती घडविण्यासाठी मंडप परवानगी देण्यात आली आहे. ज्या मूर्तिकारांना आणखी शाडू माती हवी असेल, त्यांनी महापालिकेच्या संकेतस्थळावर (www.mcgm.gov.in) 'नागरिकांकरीता' या रकान्यामध्ये 'अर्ज करा' या रकान्यात 'मंडप (सार्वजनिक गणेशोत्सव/नवरात्रौत्सव/इतर उत्सव)' या सदरामध्ये मागणी नोंदवावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्यावतीने उप आयुक्त (परिमंडळ २) तथा श्रीगणेशोत्सवाचे समन्वयक प्रशांत सपकाळे यांनी केले आहे.

श्रीगणेशोत्सव सन २०२५ पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी महापालिकेने नियोजन व कार्यवाही सुरू केली आहे. प्रशासनाकडून निरनिराळया सेवा-सुविधा पुरविण्यात येत आहेत. पर्यावरणपूरक उत्सवासाठी सर्व बाबींचा अवलंब केला जात आहे. यावर्षी २५ जुलै २०२५ पर्यंत ९१० टन २३५ किलो इतकी शाडू माती मोफत वाटप करण्यात आली आहे. सर्वाधिक शाडू मातीचे वितरण हे 'के/पूर्व' विभागात झाले आहे. या विभागात ९६ टन ६१५ किलो इतकी शाडू मातीचे वाटप झाले. त्यापाठोपाठ 'जी/उत्तर' विभागात ९१ टन २० किलो, 'पी/उत्तर' विभागात ८२ टन ४५५ किलो, 'डी' विभागात ७४ टन २०० किलो; तर 'एफ/दक्षिण' विभागात ७२ टन ६०० किलो शाडू माती वाटप करण्यात आली.

**९९३ मूर्तिकारांना विनामूल्य मंडप जागा**

पर्यावरणपूरक मूर्ती घडविणाऱ्या मूर्तिकारांसाठी 'प्रथम अर्जदारास प्राधान्य' या तत्वावर आवश्यक ती जागा देखील विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे. पर्यावरणपूरक मूर्ती घडविणाऱ्या ९९३ मूर्तिकारांना मंडपासाठी परवानगी देण्यात आली आहे. तात्पुरत्या स्वरुपात ही जागाही मोफत देण्यात आली आहे. यामध्ये आर/दक्षिण विभागातून १३९ मूर्तिकारांना त्यापाठोपाठ के/पश्चिम विभागात ९० मूर्तिकारांना तसेच पी/उत्तर विभागात ७४, पी दक्षिण विभागात ७२ मूर्तिकारांना मंडपासाठी परवानगी देण्यात आली आहे.

## आरोग्य विभागातील 1200 कर्मचारी वेतनाविना

### कामगार सेनेचा आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या डी. एस. इंटरप्रायझेस या कंत्राटदाराकडून नियुक्त करण्यात आलेल्या तब्बल १२०० आरोग्य कर्मचारी मागील तीन महिन्यांपासून वेतनाविना आहेत. या विरोधात कर्मचाऱ्यांनी ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे. सातत्याने लक्ष वेधूनही दुर्लक्ष झाल्याने हे पाऊल उचलण्यात येत असल्याचे म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेने स्पष्ट केले आहे.

आरोग्य विभागातील परिचारिका, लॅब टेक्नीशियन, फार्मासिस्ट आणि डाटा ऑपरेटर यांच्यासह सुमारे १२०० कर्मचारी गेल्या आठ वर्षांपासून प्रामाणिक सेवा देत असूनही त्यांना हक्काचे वेतन रखडवले जात आहे. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, कर्जाचे हप्ते व रोजची कुटुंबाची दैनंदिनी कशी चालवावी हा प्रश्न भेडसावतो आहे. कामगारांच्या मागण्यांबाबत पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र देऊन लक्ष वेधण्यात आले आहे. येत्या १५ दिवसांत मागण्यांबाबत निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा कामगार संघटनेचे चिटणीस संजय वाघ, अध्यक्ष बाबा कदम यांनी दिला आहे.

**या आहेत मागण्या**

- मागील ३ महिन्यांचे थकीत वेतन तातडीने देण्यात यावे.
- २०१८ पासून थांबलेली वार्षिक वेतनवाढ लागू करावी.
- महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजा भरपगारी मिळावी, रजेच्या कालावधीत कामावरून कमी करू नये.
- सर्व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाअंतर्गत नियुक्ती द्यावी.
- कर्मचाऱ्यांना बोनस (सानुग्रह अनुदान) आणि नैमित्तिक रजा मिळाव्यात.

## नाट्य शुक्रवार हा पत्रकार संघाचा उपक्रम अविश्वसनीय - अरुण नलावडे

### 'नाट्य शुक्रवार' उपक्रमाचे ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडेयांच्या हस्ते उद्घाटन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या या ऐतिहासिक वास्तूत 'नाट्य शुक्रवार'च्या निमित्ताने नाटकाची तिसरी घंटा वाजत आहे, ही घटनाच ऐतिहासिक आहे. प्रायोगिक रंगभूमीसाठी जे काम राज्यातील विविध नाट्य संघटनांनी, नाट्य कलाकारांनी करायला हवे, ते काम मुंबई मराठी पत्रकार संघ करीत आहे. ही घटनाच अविश्वसनीय आहे. पत्रकार संघाच्या या उपक्रमाने प्रायोगिक रंगभूमीला नवी दिशा मिळेल, असे कौतुकाचे उद्गार ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे यांनी शुक्रवारी येथे काढले.




मुंबई मराठी पत्रकार संघाकडून आयोजित 'नाट्य शुक्रवार' या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, दिग्दर्शक-लेखक मिलिंद पेडणेकर, इंडियन ऑईलचे कॉर्पोरेट कम्युनिकेशनचे महाव्यवस्थापक डॉ. अभिषेक कुमार, विश्वस्त वैजयंती आपटे, राही भिडे, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर आणि नाट्य शुक्रवार समिती सदस्य रवींद्र देवधर व नयना रहाळकर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील प्रायोगिक रंगभूमीला प्रोत्साहन देण्यासाठी 'नाट्य शुक्रवार' हा अभिनव उपक्रम पत्रकार संघातर्फे सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत, मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात दर महिन्याच्या चौथ्या शुक्रवारी प्रायोगिक रंगभूमीवरील दर्जेदार नाट्यप्रयोगांचे मोफत सादरीकरण होणार आहे. नवोदित व प्रायोगिक रंगकर्मींसाठी हे व्यासपीठ खुले असणार असून नाट्यप्रेमींना प्रयोगांचा नि:शुल्क आनंद घेण्याची संधी यातून मिळणार आहे.



**मुंबई :** नांदगाव विकास मंडळाचे संस्थापक व विद्यमान अध्यक्ष गजानन लक्ष्मण रेवडेकर यांच्या शुभहस्ते सौ. वर्षा दिघे-मोरये यांच्या विशेष येगदानाबद्दल शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि श्रीदेव कोळंबा प्रतिमा देऊन, श्रीदेव कोळंबा जत्रेचे औचित्य साधून शिवडी येथील कोळी समाज हॉल येथे सन्मानित करण्यात आले. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व वित्त सभापती नागेश रामचंद्र मोरये, मंडळाचे माजी अध्यक्ष विठ्ठल (बाळ) मोरये, सरचिटणीस राजेंद्र नामदेव मोरये आणि जत्रा प्रमुख रविंद्र बाळकृष्ण म्हसकर यांच्या उपस्थितीत दहावी-बारावी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

## घाटकोपर येथील गुजराती समाज सभागृहाची पाटी मराठीत करण्याची मनसेची मागणी

### अन्यथा गुजराती पाटीला काळे फासण्याचा ॲड.अभिषेक सावंत यांचा इशारा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

घाटकोपर पश्चिम येथील भारतीय जनता पार्टी चे माजी नगरसेवक प्रविण छेड़ा यांच्या मार्फत कार्यरत असलेल्या गुजराती समाज सभागृहाचे फलक मराठी ऐवजी गुजराती भाषेत लावण्यात आल्यामुळे मनसेचे पदाधिकारी ॲड.अभिषेक सावंत यांनी मनपाकडे तक्रार करून मराठी फलक न केल्यास गुजराती पाटीला काळे फासण्याचा ईशारा दिला आहे.

जीवदया लेन,घाटकोपर पश्चिम येथे माजी लोकप्रतिनिधी प्रविण छेड़ा यांनी गुजराती समाज सभागृह म्हणुन जागा अडवून बांधकाम केलेले आहे. त्यावरील पाटी ही मराठीत नसून गुजराती भाषेत लावण्यात आलेली आहे. त्याविरोधात ॲड.अभिषेक सावंत व महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडून महानगर पालिकेकडे तक्रार करण्यात आली असून येत्या काही दिवसात मराठी पाटी न बसवल्यास या गुजराती पाटीला काळे फासण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे विभाग सचिव ॲड.अभिषेक सावंत यांनी दिला आहे.

सद्या मराठीचा मुद्दा मुंबईत आक्रमक झाला असल्यामुळे माजी नगरसेवक प्रवीण छेडा यांच्या मार्फत काय पावले उच्चली जातात याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

महाराष्ट्रातील 7 खासदारांनी दिल्लीत गाजवलं नाव

# सुळे, गायकवाड, सावंत, कुलकर्णी, बारणे, वाघ, म्हस्के यांना संसदरत्न पुरस्कार



**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

संसदेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एकूण १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार २०२५ देण्यात आला. राज्यातील ७ खासदारांचा पुरस्कारात समावेश आहे. यामध्ये सुप्रिया सुळे, वर्षा गायकवाड यांचाही समावेश आहे. भाजप, काँग्रेस, शिंदे सेना आदी पक्षांच्या खासदारांना पुरस्कार प्राप्त झाला आहे. सुप्रिया सुळे आणि श्रीरंग बारणे यांना विशेष ज्युरी पुरस्कारानेही गौरवण्यात आले आहे.

संसदेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी १७ खासदारांना संसदरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. या पुरस्कार यादीत सुप्रिया सुळे, रवीकिशन, निशिकांत दुबे, अरविंद सावंत यांच्यासहित इतर खासदारांचा समावेश आहे. या यादीत महाराष्ट्रातील ७ खासदारांचा समावेश आहे.

संसदेतील चार खासदारांना विशेष ज्युरी पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. यात भाजपचे भर्तृहरि महताब, खासदार एन के प्रेमचंद्रन, सुप्रिया सुळे, श्रीरंग अप्पा बारणे यांच्या नावाचा समावेश आहे. या सर्वांनी १६ व्या लोकसभेपासून चांगली कामगिरी केली आहे.

भाजपच्या स्मिता वाघ, शिंदे गटाचे नरेश म्हस्के, काँग्रेसच्या वर्षा गायकवाड, भाजपच्या मेधा कुलकर्णी, प्रवीण पटेल, विद्युत बरन महतो, दिलीप सैकिया यांना पुरस्कार मिळाला आहे. तर खासदार एनके प्रेमचंद्रन यांना पाचव्यांदा संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे.

# राहुल गांधींच्या नशिबात कायम माफी मागणंच लिहिलंय!



**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एका कार्यक्रमात बोलताना शुक्रवारी ओबीसींच्या मुद्यांवर बोलताना महत्वाचं भाष्य केलं. यावेळी बोलताना राहुल गांधींनी जातनिहाय जनगणना न करणं ही माझी चूक होती. आता चूक सुधारायची आहे, असं म्हटलं होतं. राहुल गांधी यांच्या या विधानावर बोलताना भाजपाचे नेते तथा देशाचे कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी जोरदार टीका केली आहे. 'राहुल गांधींच्या नशिबात कायमच माफी मागणं लिहिलंय', असं म्हणत आता राहुल गांधी जे करत आहेत त्यासाठी पुन्हा पुढच्या १० वर्षांनी माफी मागतील असा घणाघातही कृषीमंत्री चौहान यांनी केला. राहुल गांधी यांना खूप उशिरा समजते. आधी राहुल गांधींनी आणीबाणीसाठी माफी मागितली. त्यानंतर त्यांनी शीख दंगलींच्या प्रकरणासंदर्भात माफी मागितली. त्यानंतर आता राहुल गांधींनी ओबीसींची माफी मागितली, असं चौहान म्हणाले.























